महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) छत्रपती संभाजीनगर

School Leadership Academy, Maharashtra

सन २०२५-२६

मोड्यूल क्रमांक : ६८

# संघ बांधणीतून शालेय विकासात शालेय नेतृत्वाची भूमिका

# "The Role of School Leadership in School Development Through Team Building"




**प्रस्तावना:-**

"एकत्र येणे ही सुरुवात आहे, एकत्र राहणे ही प्रगती आहे आणि एकत्र काम करणे हे यश आहे". राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या धोरणातील तत्त्वांमध्ये संप्रेषण, सहकार्य ,संघकार्य आणि लवचिकता यासारखे जीवन कौशल्य विकसित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. नेतृत्त्व आणि संघबांधणी हा शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. प्रभावी नेतृत्त्व केवळ शाळा चालवत नाही तर संघ भावनेने काम करते. शाळा ही एकट्याचे काम नसून संपूर्ण टीमचे काम आहे. मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक या सर्वांना एकत्र गुंफणे म्हणजे संघ बांधणी. संघ बांधणी ही एक प्रक्रिया आहे , ज्याद्वारे शाळा समूहाला एका

कार्यक्षम संघात रूपांतरित केले जाते. यामध्ये केवळ एकत्र काम करणे अपेक्षित नसते तर एकमेकांवरील विश्वास आणि सामायिक उद्दिष्टे पूर्ण करण्याची भावना महत्त्वाची असते.

**"संघ बांधणी म्हणजे एकट्याने मिळणाऱ्या परिणामापेक्षा अधिक चांगला परिणाम सामूहिक प्रयत्नातून मिळविणे होय."**

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे :-**

- संघ बांधणीमध्ये शालेय नेतृत्त्वाचे महत्त्व समजून घेणे .
- संघ बांधणीत शालेय नेतृत्त्वाला येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
- शालेय नेतृत्वाकडून संघ बांधणी करिता योग्य लोकांची निवड करणे.
- संघ बांधणीत शालेय नेतृत्वाकडून प्रत्येक व्यक्तीच्या भूमिका निश्चित करू कार्यवाही करणे.
- संघ बांधणीमध्ये शालेय नेतृत्त्वाची भूमिका समजून घेणे.
- संघ बांधणीत परस्पर संवाद टिकून ठेवून शाळेच्या प्रगतीच्या दृष्टिकोनातून वाटचाल करणे.
- संघ बांधणीत यशस्वी शालेय नेतृत्त्वाचा अभ्यास करणे.

**संघ बांधणी संकल्पना :-**

संघ बांधणीमध्ये पारदर्शक आणि स्पष्ट संवाद असणे आवश्यक आहे. एकमेकांच्या समस्या समजून घेतल्याने कामात सुसूत्रता येते. टीम मध्ये काम करताना, कामाचे वाटप करताना सदस्यांच्या आवडीनुसार आणि कौशल्यानुसार कामाचे वाटप केल्यास कामाचा दर्जा सुधारण्यास मदत होते. संघात काम करताना एकमेकांवर विश्वास असणे देखील आवश्यक आहे .त्यामुळे शाळेची यशाकडे वाटचाल सुरू होते.

संघातील सदस्यांची कल्पनाशक्ती उपयोगात आणण्यासाठी, त्यांना प्रेरित ठेवण्यासाठी आणि संघाच्या उद्देशानुसार प्रगती करण्यासाठी संघातील संवाद सर्वात महत्त्वाचे असतात. संघ बांधणीमध्ये पारदर्शक आणि स्पष्ट संवाद असणे आवश्यक आहे.

एकमेकांच्या समस्या समजून घेतल्याने कामात सुसूत्रता येते. टीममध्ये काम करताना, कामाचे वाटप करताना सदस्यांच्या आवडीनुसार आणि कौशल्यानुसार कामाचे वाटप केल्यास कामाचा दर्जा सुधारण्यास मदत होते. संघात काम करताना एकमेकांवर विश्वास असणे देखील आवश्यक आहे . शालेय नेतृत्वासाठी व शिक्षकांसाठी व्यावसायिक संवाद महत्त्वपूर्ण आहे त्यानुसारच नियोजनबद्ध कृती करून यशस्वी वाटचालीकडे जाता येते.

शालेय नेतृत्वात संघ बांधणी करताना प्रभावी आणि नैतिक संवाद हा परस्पर विश्वास निर्माण करण्यासाठी, आपापसातील संबंध सुधारण्यासाठी महत्त्वाचा आहे. यातून शालेय कामकाज सकारात्मक रित्या साध्य होण्यास मदत होते.

**शिरटी हायस्कुल, शिरटी.**




**जि. प. शाळा चाळणवाडी**





**जि. प. शाळा ठमकेवाडी**




**विद्या मंदिर हणबरवाडी**

**अध्ययन निष्पत्ती :-**

संघ बांधणीतून शालेय विकासात शालेय नेतृत्त्वाची भूमिका हे मोड्यूल पूर्ण केल्यावर शाळा प्रमुख खालील बाबी करण्यासाठी सक्षम होतील...

1) शाळेचे मुख्याध्यापक शालेय दृष्टी व ध्येयानुसार सर्मपित व्यावसायिक संघ तयार करणे आणि संघाचे नेतृत्त्व करणे याचा अर्थ
   समजून घेतील.
2) शाळेचे मुख्याध्यापक संघ बांधणीतून शालेय विकाससात शालेय नेतृत्त्वाची भूमिका समजून घेतील.
3) शाळा प्रमुख संघ बांधणीत येणाऱ्या अडचणींचा शोध घेतील.
4) शाळा प्रमुख संघबांधणी करिता योग्य कामासाठी योग्य माणसांची निवड करतील.
5) शाळा प्रमुख यशस्वी शालेय नेतृत्त्वाचा अभ्यास करून स्वतःच्या शाळेचे परिवर्तन करतील.

**सामायिक ध्येय (common goal ):-**

संघ बांधणीमध्ये शाळेतील प्रत्येक मानवी घटकाला शाळेचे अंतिम ध्येय काय आहे ? हे स्पष्टपणे माहित असावे लागते. जेव्हा सर्वांचे लक्ष्य एक असते तेव्हा कामात सुसूत्रता येते.

**परस्पर विश्वास (mutual Trust) :-**

परस्पर विश्वास हा कोणत्याही संघाचा पाया असतो. शाळेतील प्रत्येक मानवी घटकांचा एकमेकांच्या क्षमतेवर विश्वास असेल तरच मोकळेपणाने मतांची मांडणी करता येईल आणि एकमेकांना मदत करता येईल.

**प्रभावी संवाद (Effective communication) :-**

शाळेचा विकास करण्यासाठी शालेय संघात विचारांची देवाण-घेवाण स्पष्ट आणि पारदर्शक असावी लागते. प्रभावी संवाद साधता येत असेल तर आपसातील गैरसमज दूर व्हायला मदत होते आणि कामाचा वेग वाढतो.

**भूमिका व जबाबदाऱ्यांची स्पष्टता (clarity of roles) :-**

शालेय नेतृत्त्व करताना मुख्याध्यापकांनी कामाचे वाटप योग्य पद्धतीने करणे अपेक्षित असते. त्यामुळे संघात प्रत्येक मान्य घटकांनी काय काम करायचे आहे? त्यांची जबाबदारी काय आहे? हे निश्चित होण्यास मदत होते आणि पर्यायाने कामाची पुनरावृत्ती टाळता येते.

**विविधतेचा आदर (Respect for Diversity) :**

शाळेतील मुख्याध्यापक,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी आणि यांच्यात काम करण्याची क्षमता व कौशल्य यात विविधता असू शकते. त्यामुळे प्रत्येकाच्या वेगळेपणाचा आदर त्यांच्या क्षमता व कौशल्यांचा वापर शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी करणे गरजेचे असते.

**नेतृत्त्व :-**

एक चांगला नेता संघाला दिशा देतो. त्यामुळे शाळेचे नेतृत्त्व करणाऱ्या मुख्याध्यापकांची भूमिका संघ बांधणीत महत्त्वाची असते.

**संघ बांधणीतून शाळेचा विकास व्हावा म्हणून संघ बांधणीची काही उद्दिष्टे :-**

1) संघ बांधणीतून जलद गतीने व अचूक कामे करणे.
2) सांघिक चर्चा व मतामुळे नवीन कल्पना सुचण्यास मदत होणे.
3) शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे मनोधैर्य उंचावणे.
4) परस्पर विश्वास वाढविणे.
5) संघातील प्रत्येकाची भूमिका व जबाबदारी निश्चित करणे.
6) प्रभावी संवाद साधणे.
7) शालेय समस्या सोडविणे.
8) शालेय वातावरण आनंदी उत्साही व प्रसन्न ठेवणे.
9) शालेय विकासासाठी आर्थिक मदत, मनुष्यबळ व भौतिक सामग्री प्राप्त करणे.
10) मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक व समाज यांच्यातील संबंध जोपासणे.
11) शालेय कार्यावर नियंत्रण प्रस्थापित करणे.
12) सांघिक कृतीतून परस्पर सहकार्याची भावना वाढीस लागणे.

**शालेय विकासासाठी संघ बांधणी करताना शालेय नेतृत्त्वासमोरील आव्हाने :-**

प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आले आहे. त्याचबरोबर शाळेच्या भौतिक सुविधा व शैक्षणिक गुणवत्ता संबंधित कामकाजाची जबाबदारी शाळेच्या मुख्याध्यापकांची आहे. संघ बांधणी करताना ,शाळेचा सर्वांगीण विकास करताना, मुख्याध्यापकांना शिक्षक, विद्यार्थी, पालक व समाज यांच्याशी समन्वय साधताना काही आव्हानांना तोंड द्यावे लागते.

**संघ बांधणीत मुलांशी संबंधित आव्हाने :-**

1) शाळांच्या स्पर्धेत विद्यार्थी पटसंख्या टिकविणे हे शालेय नेतृत्त्वासमोर एक आव्हान असते.
2) कमी पटसंख्या असल्याने शाळा टिकवण्याचे आव्हान शालेय नेतृत्त्वासमोर असते.
3) गावात किंवा पंचक्रोशीतील शाळांच्या स्पर्धेतून विद्यार्थी शिफ्टिंग मुळे शालेय नेतृत्त्वासमोर आव्हान उभे राहते.

4) शाळेत संघकार्य नसेल तर विद्यार्थ्यांच्या अध्ययन अध्यापनावर परिणाम होतो हे शालेय नेतृत्त्वासमोर आव्हान असते.
5) मुळात शाळाच एक शिक्षकी किंवा द्विशिक्षकी असेल तर अशावेळी शालेय नेतृत्त्वासमोर खूप मोठी आव्हाने असतात.

**शिक्षकांशी संबंधित आव्हाने :-**

1) एक शिक्षकी शाळेत संघ बांधणी करता येत नसल्याने शालेय नेतृत्त्वापुढे मोठे आव्हान निर्माण होते.
2) द्विशिक्षकी शाळेत संघ बांधणी करताना आव्हाने निर्माण होतात.
3) बहुशिक्षकी शाळेत कामाचे वाटप करताना सर्व शिक्षकांच्या मनाप्रमाणे काम देणे हे शालेय नेतृत्त्वासमोर आव्हान असते.
4) ज्यादा तासाचे नियोजन करताना शाळेच्या नेतृत्त्वासमोर आव्हान असते.
5) समाजाचा सहभाग घेताना शाळेच्या नेतृत्त्वासमोर आव्हान असते.
6) सुविधांची उपलब्धता पूर्ण करण्यासाठी CSR ची मदत घेताना शिक्षकांची अनास्था असेल तर नेतृत्त्वासमोर आव्हान असते.
7) संघ बांधणी शंभर टक्के शिक्षकांचा सहभाग नसणे हे नेतृत्त्वासमोर आव्हान असते.
8) शाळेत शिक्षकांमध्ये विसंवाद असणे हे नेतृत्त्वासमोर आव्हान असते.
9) मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यामध्ये सुद्धा विसंवाद असणे हे नेतृत्त्वासमोर आव्हान असते.
10) शाळेच्या गुणवत्ता वाढीत योगदान देण्यासाठी शिक्षकांकडून अतिरिक्त वेळ न मिळणे हे नेतृत्त्वासमोर आव्हान असते.
11) नवीन बदल, प्रशिक्षण, कार्यशाळा यात शिक्षकांचा सहभाग वाढविण्यासाठी नेतृत्त्वासमोर आव्हान असते.

**पालकांशी संबंधित आव्हाने :-**

1) एक शिक्षकी शाळेबद्दल पालकांचा दृष्टिकोन नकारात्मक असतो.
2) द्विशिक्षकी शाळेबद्दल पालकांचा दृष्टिकोन उदासीन असतो.
3) शालेय वातावरण दूषित असेल तर पालकांची दुसऱ्या शाळेमध्ये पाल्य घालण्याची मानसिकता असते.
4) पालकांच्या शाळेबद्दल वाढत्या अपेक्षा असतील तर शालेय नेतृत्त्वासमोर आव्हान असते.
5) ग्रामीण भागात पालक निरक्षर असतील तर शालेय नेतृत्त्वासमोर आव्हान असते.
6) मुलांच्या अभ्यासाकडे पालकांचे दुर्लक्ष असणे.
7) शाळेबद्दल पालकांचे मत परिवर्तन करून मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवणे हे शालेय नेतृत्त्वापुढे आव्हान असते.
8) शाळांच्या स्पर्धेत पालकांची शाळा बद्दल होणारी दोलायमान स्थिती शालेय नेतृत्त्वापुढे आव्हान ठरते.

**समाजाशी संबंधित आव्हाने** :-

1) संघ बांधणीत समाजाचा सहभाग मिळवणे शक्य होत नाही.
2) समाजाकडून काही वेळा शाळेला अपेक्षित सहकार्य मिळत नाही.
3) शाळेत बेबनाव असेल तर समाजाचे सहकार्य मिळणे कठीण होते अशावेळी नेतृत्त्वापुढे आव्हान उभे राहते.

**शालेय विकासासाठी संघ बांधणीतून यशस्वी शालेय नेतृत्त्वाचा अभ्यास**

जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था कोल्हापूर, येथे वरिष्ठ अधिव्याख्याता या पदावर कार्यरत असल्याने संकलित चाचणी PAT, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा, नवभारत साक्षरता, वार्षिक तपासणी ,विद्यार्थी उपस्थिती ,शाळा

गुणवत्ता या संदर्भात जिल्ह्यात शाळा भेटी केल्या आहेत. शाळेसाठी धडपडणारे मुख्याध्यापक ,शिक्षक यांचे कार्य अनेक भेटीद्वारे नजरेसमोर येते. त्यातूनच संघ बांधणीत अचूक व उत्तम कार्य करणाऱ्या शालेय नेतृत्वाचे काम सर्वांसमोर ठेवल्यास त्याचा निश्चित फायदा होईल. या दृष्टीने खालील शाळांची यशोगाथा देत आहे.

**संघ बांधणीतून करावयाचे शालेय कार्य:-**




**यशस्वी शालेय नेतृत्त्वाचा अभ्यास करण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील निवड करण्यात आलेल्या शाळा**

| अनुक्रमांक | शाळेचे नाव | मुख्याध्यापकाचे नाव |
|---|---|---|
| 1) | शिरटी हायस्कूल शिरटी, तालुका शिरोळ, जिल्हा कोल्हापूर. | श्री.अजयकुमार खवाटे |
| 2 ) | जि. प. शाळा चाळणवाडी, तालुका शाहूवाडी, जिल्हा कोल्हापूर. | श्री.संदीप पाटील |
| 3) | जि. प. शाळा ठमकेवाडी, तालुका शाहूवाडी, जिल्हा कोल्हापूर. | श्री. संभाजी खोत |
| 4) | विद्या मंदिर हणबरवाडी, तालुका करवीर, जिल्हा कोल्हापूर. | श्री. भिकाजी डवरी |

# यशोगाथा क्रमांक 1
# शिरटी हायस्कूल, शिरटी.
# तालुका शिरोळ ,जिल्हा कोल्हापूर.
# मुख्याध्यापक - श्री.अजितकुमार खवाटे







संघ बांधणीतून शाळेचा विकास करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अशा प्रतिकूल परिस्थितीत आपल्या नेतृत्त्वाचा यथायोग्य वापर करून मुख्याध्यापक व शिक्षक आपल्या शाळेला यशोशिखरावर घेऊन जाण्यात यशस्वी होताना दिसून येतात. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत वरिष्ठ अधिव्याख्याता पदावर कार्यरत असताना शाळा भेटी, शिक्षण परिषदा, वार्षिक तपासणी, शाळा मूल्यांकन ,प्रशिक्षण भेटी व विविध कार्यशाळा इत्यादीसाठी संपर्क करावा लागतो . समन्वय साधत असताना शिरटी हायस्कूल, शिरटी तालुका शिरोळ, जिल्हा कोल्हापूर. या शाळेत भेट देण्याचा योग श्री. सचिन रोडे यांच्यामुळे आला. सातत्याने या शाळेचे निरीक्षण करता आले. शाळेत प्रवेश करतानाच भव्य कमान लक्ष वेधून घेते. मुख्याध्यापक सांगतात की, शाळेत एक दुर्दैवी घटना घडली, त्यामुळे शाळा टिकवणे खूप आव्हानात्मक होते. त्याच कालावधीत 2021मध्ये श्री. खवाटे यांच्याकडे मुख्याध्यापक पदाची जबाबदारी आली. सरांना आलेल्या अडचणी, त्यावर केलेले उपाय व फलश्रुती खालीलप्रमाणे..

| अ.क्र. | आव्हाने/अडचणी | केलेले उपाय | फलश्रुती |
|---|---|---|---|
| 1. | शाळेचा पट टिकवणे कठीण झाले होते. | 1.शाळेतील सर्व शिक्षकांना नवकल्पना व शैक्षणिक प्रयोग करण्यासाठी प्रोत्साहन दिले.<br>2. IT lab मध्ये शासनाकडून 13 संगणक व लोकवर्गणीतून सहा संगणक मिळवले.याचा विद्यार्थ्यांना व शिक्षकांना अध्ययन अध्यापनात उपयोग होतो.<br>3.लोकवर्गणीतून ओपन जिम शालेय परिसरात तयार केली. ओपन जिममुळे विद्यार्थ्यांबरोबरच गावकऱ्यांना सुविधा प्राप्त झाली. यासाठी ग्रामपंचायत मध्ये श्री .अथर्व गुरव व श्री. राहुल सूर्यवंशी यांनी सुमारे सात लाख रुपये वर्गणी दिली. | 1.शाळेची शैक्षणिक गुणवत्ता सुधारली.<br>2.अध्यापन अधिक प्रभावी व नियोजनबद्ध झाले.<br>3.शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल दिसून आला.<br>4.पालकांचा विश्वास व सहभाग वाढला सहशालेय उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढला.<br>5.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना मिळाली.<br>6.शाळेची एकूण प्रतिमा व दर्जा उंचावला. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 4.दोन एकरच्या एक गुंठा परिसरात दोन्ही बाजूंना चिकू, मोरआवळा, चिंच, नारळ या झाडांचे वृक्षारोपण केले. यासाठी प्रकाश ग्रामीण बिगर पतसंस्था, शिरटी किसान विकास सोसायटी व जोगोंडा पाटील विकास सोसायटी यांच्यामार्फत खड्डे, माती व खत उपलब्ध करून घेतले. | |
| 2 | भौतिक सुविधांची शाळेत वानवा होती. | 1.शाळेतील भौतिक सुविधा मध्ये वाढ केली. रोटरी क्लब इचलकरंजी यांच्याकडून आठ लाख निधीतून शिक्षक, मुलामुलींसाठी स्वच्छतागृहे बांधली.<br><br>2.चेंजिगरूम तयार केली. यामुळे विद्यार्थिनीचे अनुपस्थितीचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली. | 1.शाळेतील भौतिक सुविधा सुधारल्या व आवश्यक साहित्य उपलब्ध झाले.<br>2.विद्यार्थ्यांना स्वच्छ, सुरक्षित व आकर्षक वातावरण मिळाले.<br>3.अध्यापनासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध झाल्याने शिकवणे अधिक प्रभावी झाले.<br>4.विद्यार्थ्यांची शाळेत येण्याची आवड व उपस्थिती वाढली.<br>5.शिक्षकांना काम करण्यासाठी सुविधा व प्रेरणादायी वातावरण मिळाले.<br>6.शाळेचा एकूण दर्जा व प्रतिमा सुधारली.<br>7.पालक व समाजाचा शाळेवर विश्वास वाढला.<br>8.विविध उपक्रम राबवण्यासाठी अनुकूल वातावरण तयार झाले. |
| 3 | शिक्षकांची मानसिक स्थिती बिघडली होती. शिक्षकांची व शिपाई यांची मानसिकता सुधारणे व संघ बांधणी करणे आव्हान होते. | १.शिक्षकांची मानसिकता बदलललली. मानसिकता बदलण्यासाठी वेळ दिला. संयम व सात्यय ठेवले. शिक्षकांसाठी शाळेत सकारात्मक वातावरण तयार केले .<br><br>2.शिक्षकांना प्रशिक्षण व वेगवेगळ्या कार्यशाळा मध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दिली.<br><br>3.शाळेत सर्व स्टाफसाठी समुपदेशकांची सत्रे आयोजित केली.<br><br>4.शिक्षकांशी नियमित सुसंवाद साधला.<br><br>5.शाळेत प्रेरणादायी वातावरण तयार केली." मी सांगतो म्हणून तुम्ही करा" असे सांगण्याऐवजी "आपण मिळून करूया"! असा दृष्टिकोन मुख्याध्यापकांनी ठेवला.<br>6. शाळेत एकूण तीन शिपाई आहेत. सर्व आज्ञाधारक व तत्पर आहेत .शिपायांच्या कामाचे वाटप केले. सर्व शिपाई प्रामाणिकपणे काम करतात . सकाळी 7.30 ते रात्री 8.00 वाजेपर्यंत शाळेची कामे शिपाई करतात. | 1.शिक्षकांमध्ये आत्मविश्वास वाढला व कामाबद्दल सकारात्मकता निर्माण झाली. तणाव व मानसिक दडपण कमी झाले, त्यामुळे काम करण्याची ऊर्जा वाढली.<br>2.शाळेतील कामकाज अधिक सुरळीत व नियोजनबद्ध झाले.<br>3.शिक्षकांमध्ये समन्वय व सहकार्याची भावना वाढली.<br>4.विद्यार्थ्यांकडे लक्ष देण्याची उत्सुकता व गुणवत्ता सुधारली.<br>5.अनुपस्थिती व दुर्लक्ष कमी झाले, जबाबदारीची जाणीव वाढली.<br>6.शाळेचे एकूण शैक्षणिक वातावरण सकारात्मक व प्रेरणादायी झाले. पालक व समाजात शाळेबद्दल विश्वास वाढला. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | निवांत बसणे शिपायांच्या रक्तातच नाही. शाळेच्या विकासासाठी सर्व शारीरिक कष्टाची कामे, क्रीडांगणावर भर घालणे, झाडांना पाणी,खत घालणे ,स्वच्छतागृह स्वच्छ करणे , परीक्षा विभागाची स्टेशनरी तयार करणे, टी क्लब चालविणे, अशी कितीतरी कामे शिपाई वर्ग आनंदाने करताना दिसून येतो. शाळेत पाऊल ठेवल्याबरोबरच मोठा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवल्याची प्रचिती तात्काळ येते. श्री. खावाटे सहशालेय उपक्रमात जयंती, पुण्यतिथी कार्यक्रमात फोटो पूजनाचा मान शिपायांना देतात. | |
| 4 | पंचक्रोशीतील शाळांनी विद्यार्थ्यांचे प्रवेश स्वतःच्या शाळेकडे वळविले होते. | 1.गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केले. जास्तीत जास्त विद्यार्थी शाळेत प्रवेशित व्हावेत, टिकावेत व शिकावेत यासाठी शाळेची वेळ सकाळी 10.00 ते संध्याकाळी 6.00 ठेवली. यात अप्रगत मुलांसाठी ज्यादा तास, दहावी व शिष्यवृत्तीसाठी ज्यादा तासांचे नियोजन केले.<br>2.सर्व इयत्ता करिता अभ्यासिका सुरू केल्या.<br>3. सर्व शिक्षकांच्या मदतीने विषयांचे नियोजन करून घेतले व इयत्ता सहावी ते नववी साठी JEE व NEET फाउंडेशन कोर्स सुरू केले.<br>4. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना इतर शाळेतील विषय तज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले. प्रत्येक विषयासाठी दोन अशी अठरा व्याख्याने आयोजित केली. सकाळी 8.00 ते 10.00 मॉर्निंग स्टडी घेतला . याचा सकारात्मक परिणाम म्हणजे शाळेचा निकाल व विद्यार्थी प्रवेश या दोन्हीत वाढ झाली आहे. | 1.विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली अभ्यासातील रुची वाढली.<br><br>2.शिस्तबद्ध वातावरण निर्माण झाले. |
| 5 | समाजाचा शाळेकडे बघण्याचा दृष्टिकोन नकारात्मक झाला होता. | 1.लोकवर्गणीतून शालेय परिसराची सुधारणा केली. सुमारे चार लाख रुपये लोक वर्गणीतून शाळेसाठी संरक्षण भिंत बांधली . अडीच लाख रुपये निधीतून पेव्हिंग ब्लॉक बसवले.दोन लाख रुपये निधीतून इंटर ॲक्टिव्ह बोर्ड बसवला. दोन इंटर ॲक्टिव्ह बोर्ड शिक्षक आमदार फंडातून मिळवले.<br>2.इंजिनीयर श्री.इस्माईल मुलाणी हे शाळेच्या गार्डनसाठी रोपे लागवड, निगा, छाटकाम सातत्याने विनाशुल्क पुरवतात. | 1.शाळेची शैक्षणिक गुणवत्ता सुधारली.<br>2.अध्यापन अधिक प्रभावी व नियोजनबद्ध झाले.<br>3.शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल दिसून आला.<br>4.विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली.<br>5.अभ्यासातील रुची वाढली.<br>6.शिस्तबद्ध वातावरण निर्माण झाले.<br>7.पालकांचा विश्वास व सहभाग वाढला.<br>8.सहशालेय उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढला.<br>9.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना मिळाली.<br>10.शाळेची एकूण प्रतिमा व दर्जा उंचावला. |
| 6 | पालकांनी शाळेकडे पाठ फिरवली होती व | 1.पालक सभा, गृहभेटीच्या माध्यमातून सातत्याने विद्यार्थ्यांची प्रगती मांडली. शाळा मुलांसाठी नवीन वेगळे काय करते हे कृतीतून दाखवून दिले. | 1.शाळेची शैक्षणिक गुणवत्ता सुधारली<br>2.अध्यापन अधिक प्रभावी व नियोजनबद्ध झाले. |

| | | | |
|---|---|---|---|
| | शाळेबद्दल मत दूषित झाले होते. | 2.शाळेत माता पालकांसाठी हळदी कुंकूचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर घेतला जातो .महिलांच्या पाककला स्पर्धा घेतल्या जातात. सांस्कृतिक कार्यक्रम घेतला जातो. | 3.शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल दिसून आला.<br>4.विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली.<br>5.अभ्यासातील रुची वाढली.<br>6.शिस्तबद्ध वातावरण निर्माण झाले.<br>7.पालकांचा विश्वास व सहभाग वाढला.<br>8.सहशालेय उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढला.<br>9.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना मिळाली.<br>10.शाळेची एकूण प्रतिमा व दर्जा उंचावला. |
| 7 | अध्ययन अध्यापनावर परिणाम झाला. होता. | 1.विद्यार्थी शाळेत टिकावेत यासाठी शिक्षकांना एकत्रित आणले.<br>2.सातत्याने स्टाफ मिटिंग मध्ये सकारात्मक कृती केल्या. 3.कामाचे योग्य वाटप केले. शिक्षक यांच्या आवडीनुसार व कौशल्यानुसार विभागांचे वाटप केले .त्यामुळे शिक्षकांना प्रत्येक कार्यक्रम यशस्वी करता आला. | 1.अध्यापन अधिक प्रभावी व नियोजनबद्ध झाले.<br>2. शिक्षकांनी वेळेचे व अभ्यासक्रमाचे योग्य नियोजन केले.<br>2.विद्यार्थ्यांची अभ्यासातील रुची व सहभाग वाढला.<br>3.शिकवण्याच्या पद्धतीत नवीन तंत्रांचा वापर (क्रियाशील, विद्यार्थीकेंद्रित पद्धती) वाढला.<br>4.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा दिसून आली.<br>5.उपस्थिती वाढली व वर्गातील एकाग्रता सुधारली.<br>6.शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत अडचणींकडे अधिक लक्ष दिले.<br>7.अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुसंवादी व आनंददायी झाली.<br>8.शाळेचा एकूण शैक्षणिक दर्जा उंचावला. |

श्री.खवाटे यांचा प्रत्येक वर्गात इंटरॲक्टिव्ह बोर्ड बसवण्याचा मानस आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण ग्रामीण भागातील मागास , आर्थिक मागास पालकांच्या पाल्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्याचे ध्येय आहे .यासाठी जर्मनी, जापनीज भाषा शिकवण्याचे नियोजन सुरू आहे. सेवानिवृत्त शिक्षक श्री. ए. आर. मगदूम यांच्या मदतीने शाळेत लेझीम संघ व झांज पथक तयार करण्याचे नियोजन आहे.शिवाय चालू वर्षापासून इंग्रजी माध्यमाचे प्राथमिक युनिट सुरु केले आहे .एक धडपडे व्यक्तिमत्त्व म्हणून खवाटे यांचे कार्य कर्तृत्त्व उल्लेखनीय आहे.

**चला तर, चिंतनात्मक प्रश्नावर थोडा विचार करूया.....**

1. संघ बांधणी करताना श्री. खवाटे यांना आलेल्या समस्यांची यादी करा.

2. श्री खवाटे यांनी संघ बांधणीतून घडवून आणलेल्या बदलांची यादी करा.

3. संघ बांधणीत शाळेमध्ये कोणत्या नेतृत्व कौशल्याची गरज आहे असे आपणास वाटते.

4.बहु शिक्षकी शाळेत संघ बांधणी करण्याची संधी तुम्हाला प्राप्त झाली तर तुमच्या कामाचे स्वरूप कसे असेल थोडक्यात लिहा.

**यशोगाथा क्रमांक** 2

जि. प. शाळा चाळणवाडी

तालुका. शाहूवाडी, जिल्हा. कोल्हापूर.

श्री.संदीप पाटील





संघ बांधणीतून शाळेचा विकास करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अशा प्रतिकूल परिस्थितीत आपल्या नेतृत्त्वाचा यथायोग्य वापर करून मुख्याध्यापक आपल्या शाळेला यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करत असताना दिसून येतात. शिक्षण परिषदा, वार्षिक तपासणी शाळा मूल्यांकन, प्रशिक्षण भेटी व विविध कार्यशाळा इत्यादीसाठी संपर्क व समन्वय साधत असताना जिल्हा परिषद शाळा चाळणवाडी, तालुका शाहूवाडी, जिल्हा कोल्हापूर. या शाळेत भेट देण्याचा योग मिपा संस्थेमुळे आला. दुर्गम भागातील मुख्याध्यापक कशा पद्धतीने कामकाज करतात हे जाणून घेण्यासाठी त्यांचा आग्रह होता.

श्री.तुषार पाटील यांच्या बरोबर शाळेस भेट देण्याचा योग आला. शाळेत पाऊल ठेवता क्षणी शाळेबद्दल माहिती विचारण्यासाठी पत्रकार श्री.भारत बुटाले शाळेत उपस्थित होते. शाळेतील चिमुकल्यांनी जापनीज भाषेत आमचे स्वागत केले.या मुलाचे खूप कौतुक वाटले. या शाळेचा पट अवघा नऊ आहे .मुख्याध्यापक सांगतात की, पूर्वीच्या शाळेवर देखील त्यांनी चांगले काम केले आहे. जिल्हा परिषद शाळा दानोळी, तालुका शिरोळ, जिल्हा कोल्हापूर. हा भाग मुळात सधन असा होता. तशी ती शाळा मोडकळीस आलेली. या शाळेत रामोशी समाजाची मुले जास्त प्रमाणात होती . सेमी इंग्रजी माध्यम सुरू केल्यामुळे आणि विविध नवोपक्रम राबविल्यामुळे शाळेचा पट 100 वरून तब्बल 250 पर्यंत गेला. शाळेतील शिक्षक संख्या तीनवरून नऊवर पोहोचली. या शाळेत आठ महिला शिक्षिका होत्या, त्यामुळे बऱ्याच वेळा प्रशासकीय कामकाजासाठी सातत्याने शाळा सोडून बाहेर राहावे लागायचे. या गोष्टीला कंटाळून दुर्गम भागातील शाळा घ्यायची हा दृढनिश्चय केला. श्री. पाटील सर जिल्हा परिषद शाळा चाळणवाडी या शाळेत 2023 पासून कार्यरत आहेत.त्यातही दुर्गम भागातील एक शिक्षकी शाळा निवडली. मला या शाळेत जगावेगळे काहीतरी करायचे आहे, एवढेच मला माहित आहे.असे सर पोटतिडकीने सांगतात. खरे तर ज्या विद्यार्थ्यांना गरज आहे त्या विद्यार्थ्यांना माझ्याकडून विद्यासेवा मिळू दे ही त्यांची मनापासूनची इच्छा आहे.99% शिक्षकांचा दुर्गम भागातील शाळाकडे

बघण्याचा दृष्टिकोन उदासीन असतो. या शाळांकडे शिक्षा म्हणून पहिले जाते. मी या शाळेकडे संधी म्हणून पाहतो. चाळणवाडी शाळेच्या भोवतालचा परिसर शांत, स्वच्छ व नैसर्गिक सौंदर्याने नटलेला आहे. शाळेच्या आजूबाजूला हिरवीगार शेती, झाडे-झुडपे आणि मोकळी हवा असल्यामुळे वातावरण प्रसन्न व आरोग्यदायी आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक वातावरणात मुलांना शिक्षण घेता येते. कोल्हा, लांडगा, रानडुक्कर, साळिंदर , गवा बिबट्या सारखे प्राणी सुद्धा दिसतात. गवा रस्त्यावरून जात असताना शिक्षकांबरोबर मुले चक्क त्यांना हात उंचावून अभिवादन करतात.त्यामुळे आक्रमक प्राणी देखील माणसाळलेले होऊन जातात. वर्षातून सहा महिने पावसाळा असल्यामुळे जळू देखील खूप असतात. अशावेळी बचावासाठी गुडघ्यापर्यंतचा रबरी बूट घालावा लागतो. दुर्गम भागात अध्यापनाचे काम करणे श्री. संदीप पाटील यांना खूप आव्हानात्मक होते. शाळा एक शिक्षकीअसल्यामुळे . . संदीप पाटील यांच्याकडे मुख्याध्यापक पदाची जबाबदारी आली. सरांना आलेल्या अडचणी, त्यावर केलेले उपाय व फलश्रुती खालीलप्रमाणे..

| अ.क्र | आव्हाने/ अडचणी | केलेले उपाय | फलश्रुती |
|---|---|---|---|
| 1. | शाळेच्या पहिल्या दिवशीच प्रवेश करताना जुनाट इमारत व आजूबाजूला गुडघाभर गवत उगवलेले दिसून आले. | 1.एक शिक्षकी शाळा असल्यामुळे मुख्याध्यापक व शिक्षक अशी एकत्रित जबाबदारी पार पाडत असताना स्वतःच नियोजन केले.<br>2. one man show ही बाब स्वतःच्या मनावर ठसवली. | 1.शाळेचा परिसर स्वच्छ, सुरक्षित व आकर्षक झाला.<br>2. गवत काढल्याने व स्वच्छता राखल्याने अपघात व भीती कमी झाली. |
| 2. | इमारत गळत असल्यामुळे सर्व बाजूंनी बुरशी जमा व्हायची.याचा मुलांच्या आरोग्यावर परिणाम व्हायचा. | 3.इमारतीची स्वच्छता करून घेतली. यात पालकांची देखील मदत होईल. | 2.इमारतीची दुरुस्ती केल्यामुळे गळती व बुरशी कमी झाली आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम झाला. |
| 3. | अजगर, गवे, बिबट्या, जळू यामुळे शाळेत यायला मुले घाबरायची. | हिंस्त्र प्राण्यांबरोबर सावधानतेच्या काही कृती केल्या. | वन्यप्राण्यांचा धोका कमी करण्यासाठी केलेल्या उपायांमुळे विद्यार्थ्यांची भीती कमी झाली व शाळेत येण्याचा आत्मविश्वास वाढला. |
| 4. | विज बिल थकीत असल्यामुळे शाळेला लाईट नव्हती.त्यामुळे शैक्षणिक तंत्रज्ञान वापरावर मर्यादा येत होती . | शाळेत विज बिल गावकऱ्यांच्या मदतीने भरले. त्यामुळे शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर करता येऊ लागला. | वीज बिल भरून व वीजपुरवठा सुरू केल्यामुळे शाळेत लाईट उपलब्ध झाली व शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर वाढला. |
| 5. | प्रचंड पावसामुळे व धुके असल्यामुळे शाळेत पोहोचणे खूप कष्टदायक असायचे. | 1.पावसाळ्याच्या दिवसात स्वतः शिक्षक विद्यार्थ्यांना शाळेत घेऊन येऊ लागले.<br>2.प्रतिकूल हवामानातही नियोजनबद्ध उपायांमुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती सुधारली. | 1.विद्यार्थ्यांची भीती कमी झाली व शाळेत येण्याचा आत्मविश्वास वाढला. |
| 6. | *इंटरनेट सुविधा* वापरण्यावर मर्यादा येत असे. | स्वतः चा नेट पॅक व laptop वापरला . | 1.इंटरनेटच्या मर्यादा असूनही पर्यायी नियोजन केल्यामुळे अध्यापनात सातत्य राखले गेले. |

| | | | |
|---|---|---|---|
| 7. | विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमता वाढविणे आवश्यक | 6. मूलभूत क्षमतांवर पूर्णपणे लक्ष केंद्रित केले त्यामुळे विद्यार्थ्यांना भाषा व गणित विषयाची आवड निर्माण झाली. | 7.इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रयत्न केल्यामुळे वाचन-लेखन<br>कौशल्यात लक्षणीय सुधारणा झाली.<br>8.शाळेचे एकूण वातावरण सुरक्षित, प्रेरणादायी व शिक्षणासाठी अनुकूल बनले.<br>9.पालक व समाजाचा शाळेबद्दल विश्वास वाढला आणि शाळेची प्रतिमा उंचावली. |
| 2 | मुलांमध्येही कमालीची अस्वच्छता दिसून आली. | 1.छोट्या-छोट्या कृती व उपक्रमांमधून मुलांच्या शिस्त व सवयी बदलल्या.<br><br>2.शाळेत प्रवेश केल्याबरोबर श्री .पाटील सर स्वतः स्वच्छतागृहाची स्वच्छता करतात. “आधी केले मग सांगितले” या उक्तीनुसार कृतीतून स्वच्छतेचे धडे शाळेत दिले जात आहेत. | 1.विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय व जाणीव निर्माण झाली.<br>2.वैयक्तिक स्वच्छता (हात धुणे, नखे कापणे, स्वच्छ कपडे) यामध्ये लक्षणीय सुधारणा दिसून आली.<br>3.शाळेचा परिसर अधिक स्वच्छ व आरोग्यदायी बनला.<br>4.विद्यार्थ्यांमध्ये होणाऱ्या आजारांचे प्रमाण कमी झाले.<br>5.स्वच्छतेमुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता व शिकण्याची क्षमता वाढली.<br>6.पालकांमध्येही स्वच्छतेबाबत जागरूकता वाढली.<br>7.विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व चांगल्या सवयी विकसित झाल्या.<br>8.शाळेची प्रतिमा व आकर्षण वाढले. |
| 3 | 1.मुलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त होते.<br>2.दुर्गम भाग असल्यामुळे वैद्यकीय सुविधांचा अभाव होता. | 1.मुलांच्या आहाराकडे लक्ष दिले. यासाठी CSR फंडाची मदत घेतली जात आहे.<br><br>2.शालेय पोषण आहारात कटाक्षाने पूरक आहार सुरू केला आहे.<br><br>3.मुलांची गुणवत्ता दिसून आल्यामुळे कुपोषण दूर करण्यासाठी, सकस आहार मिळवण्यासाठी प्रयत्न केले आणि ते यशस्वी झाले. | 1.विद्यार्थ्यांच्या पोषण स्थितीत सुधारणा झाली व कुपोषणाचे प्रमाण कमी झाले.<br>2.मुलांचे आरोग्य अधिक चांगले व तंदुरुस्त झाले.<br>3.नियमित आरोग्य तपासणी व जनजागृतीमुळे आजारी पडण्याचे प्रमाण कमी झाले.<br>4.पालकांमध्ये पोषण व आरोग्याबाबत जागरूकता वाढली.<br>5.दुर्गम भाग असूनही आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे वेळेवर उपचार मिळू लागले.<br>6.विद्यार्थ्यांची शाळेत उपस्थिती वाढली व अभ्यासात सातत्य राहिले. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 7.मुलांच्या एकाग्रतेत व शिकण्याच्या क्षमतेत सुधारणा झाली.<br>8.शाळेचे वातावरण आरोग्यदायी व सुरक्षित बनले. |
| 4 | पालक रिसॉर्ट मध्ये वेटर म्हणून काम करतात त्यामुळे जेमतेम पोटासाठी जगण्याकडे पालकांचा कल दिसून आला.<br>पालक अज्ञानी असल्यामुळे अंधश्रद्धेच्या खूप गोष्टी मुलांवर बिंबवलेल्या होत्या. | प्रत्येक उपक्रमात पालकांचा सहभाग घेतला आणि मुलांच्या स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. पालकांना विविध उपक्रमातून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.<br><br>मुले देखील स्वयंस्फूर्तीने शाळेच्या स्वच्छतेकडे लक्ष देऊ लागले आहेत. | 1.पालकांमध्ये शिक्षणाबाबत जाणीव व सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला.<br>2.केवळ उपजीविकेपुरते मर्यादित राहण्याऐवजी पालकांनी मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देण्यास सुरुवात केली.<br>3.अंधश्रद्धेबाबत जागृती निर्माण झाली व वैज्ञानिक दृष्टिकोन वाढला. मुलांवर होणारा अंधश्रद्धेचा नकारात्मक प्रभाव कमी झाला.<br>4.पालकांचा शाळेशी संपर्क व सहभाग वाढला (बैठका, उपक्रम इ.). विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व प्रगतीची जाणीव वाढली.<br>5.शाळा—पालक संबंध अधिक मजबूत व विश्वासपूर्ण झाले.<br>6.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत व वर्तनात सकारात्मक बदल दिसून आला. |
| 5 | 1.स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती अशा कोणत्याही गोष्टी पालकांच्या गावी नव्हत्या.<br>2.एकाच वर्गात सर्व इयत्तेची मुले आणि शालेय साहित्य असे होते.निरस वातावरणात मुले शिकत होती . | स्पर्धा परीक्षा ,शिष्यवृत्ती याबद्दलची माहिती पालकांना दिली जाते . अतिरिक्त शिकवणीची पालकांकडून अपेक्षा न करता सर स्वतः स्पर्धा परीक्षांची तयारी मुलांकडून करून घेतली.<br>मुलांना अभ्यासाच्या सवयी लावल्या, त्यामुळे विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत चमकू लागले.<br>पहिल्याच वर्षी प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये मुले गुणवत्ताधारक ठरली. यासाठी सातत्याने मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष केंद्रित केले.<br>विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेचे वातावरण तयार केल्यामुळे दुसऱ्या वर्षी मंथन सारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये राज्याच्या यादीत पहिल्या पाच मध्ये मुलांना प्राविण्य | 1.विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व शिष्यवृत्तीबाबत जागरूकता निर्माण झाली व त्यांचा सहभाग वाढला.<br><br>2.पालकांमध्ये शिक्षणाबाबत जाणीव व सकारात्मक दृष्टिकोन विकसित झाला.<br><br>3.एकाच वर्गातील विविध इयत्तांच्या विद्यार्थ्यांसाठी स्तरानुसार अध्यापन अधिक प्रभावी झाले.<br>4.शालेय साहित्याची उपलब्धता वाढल्याने अध्ययन प्रक्रिया सुलभ व समजण्यास सोपी झाली.<br><br>5.निरस वातावरणाऐवजी आनंददायी, उत्साही व प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण तयार झाले. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मिळविण्यात यश मिळाले. यामुळे पालकांचा शाळेकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झाला. | 6.विद्यार्थ्यांची अभ्यासातील रुची, सहभाग व आत्मविश्वास वाढला. शैक्षणिक गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा दिसून आली.<br><br>7.शाळेकडे पालक व समाजाचा विश्वास व आकर्षण वाढले. |

मुलांच्या गुणवत्तेमुळे समाजात शाळेची विशेष ओळख निर्माण झाली. यातूनच वैद्य कुटुंब मुलांना चक्क जापानी भाषा शिकवण्यासाठी पुढे आले. वैद्य कुटुंब जपान मध्ये आयफोन कंपनीत अकाउंटंट आहेत. या कुटुंबानी थेट चाळणवाडी शाळेला भेट दिली. मुलांची समज, गणितातील क्लुप्त्या ,मुलांचे इंग्रजी ज्ञान व मुलांची बुद्धिमत्ता पाहून वैद्य कुटुंब चकित झाले. ग्रामीण भागातील ही मुले इतकी क्षमता असलेली आहेत. अशा मुलांना आम्ही कशी मदत करू शकतो ?असा त्यांनी प्रश्न विचारला. "आम्हाला काही नको फक्त आमच्या मुलांना जपानी भाषा शिकवा" असे सांगितल्यामुळे वैद्य कुटुंब दर रविवारी शाळेतील विद्यार्थ्यांचा एक तास घेतात आणि मुलांना जपानी भाषा शिकवतात. सध्या जपानी भाषेत वाचन, संवाद, गाणी देखील हसत खेळत सादरीकरण करतात. भारत कल्चर सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष श्री. संदीप गुंड हे चाळणवाडी शाळेत जापनीज लोक घेऊन येत असल्याचे समजले.

चाळणवाडी शाळा 365 दिवस सुरू असते. दिवाळीची सुट्टी उन्हाळी ची सुट्टी या शाळेला माहीतच नाही. मुलं विविध गोष्टी सुट्ट्यांमध्ये शिकतात.श्री .संदीप पाटील ,त्यांच्या सौभाग्यवती श्रुती पाटील हे दोघेही अतिशय समर्पित भावनेने शाळेतील विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास करण्यात रमलेले आहेत. सावित्रीबाई फुले यांनी तत्कालीन काळात मुलींच्या शिक्षणाचा वसा घेतला होता अगदी तशाच पद्धतीने श्री संदीप पाटील यांच्या सौभाग्यवती श्रुती संदीप पाटील या देखील पाटील सरांच्या बरोबर पूर्ण वेळ शाळेत उपस्थित राहून मुलांना शिक्षणाचे धडे देतात ही बाब खरोखरच कौतुकास्पद आहे. विशेष म्हणजे त्या डी.एड आहेत .केवळ शाळेला मदत म्हणून त्या शाळेत येतात. शाळेतील विद्यार्थी तन्मय याचा आत्मविश्वास वाखाणण्याजोगा आहे. सर्व संवाद तो अतिशय आत्मविश्वासाने करतो. इतकेच काय त्याने आपल्या घराच्या भिंतीवर मी 21 व्या वर्षी कलेक्टर होणारच असे खडूने लिहून ठेवले आहे.हा आत्मविश्वास श्री .पाटील यांच्यामुळे निर्माण झाला आहे. 365 दिवस सुरु असलेल्या या शाळेची प्रेरणा सर्व शाळांनी घ्यावी असे मनापासून वाटते.

**चला तर चिंतनात्मक प्रश्नावर थोडा विचार करूया**

1. एक शिक्षकी शाळेत संघ बांधणी करताना श्री. पाटील यांना आलेल्या समस्यांची यादी करा.
2. श्री. पाटील यांनी एक शिक्षकी शाळेत संघ बांधणीतून घडवून आणलेल्या बदलांची यादी करा.
3. संघ बांधणीत एक शिक्षकी शाळेमध्ये कोणत्या नेतृत्व कौशल्याची गरज आहे असे आपणास वाटते.
4. एक शिक्षकी शाळेत संघ बांधणी करण्याची संधी तुम्हाला प्राप्त झाली तर तुमच्या कामाचे स्वरूप कसे असेल थोडक्यात लिहा.

**यशोगाथा क्रमांक 3**
**जि. प. शाळा ठमकेवाडी**

  

विद्या मंदिर ठमकेवाडी, तालुका शाहुवाडी, जिल्हा कोल्हापूर. या शाळेत दोन वर्षांपूर्वी मुख्याध्यापक म्हणून श्री. संभाजी खोत रुजू झाले. याआधी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे या ठिकाणी योगदान दिले आहे.नवनियुक्त प्रशिक्षण वर्ग , आनंदी बालशिक्षण, बालरक्षक कार्यशाळा, व्हिडिओ निर्मिती कार्यशाळा या विविध प्रशिक्षणामध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री . खोत यांनी काम केले आहे.उत्कृष्ट मार्गदर्शन आणि विषयाचे सादरीकरण यामुळे त्यांची प्रशिक्षण केंद्रावर ठळक ओळख निर्माण झाली. बोलका स्वभाव, सहकार्य वृत्ती, सर्मपित वृत्ती, प्रेरणा देणे यामुळे कमी वेळेत त्यांनी ठमकेवाडीत गावकऱ्यांच्या मनात स्थान मिळविले. Photo correspondent of ccrt Delhi हा एक वर्षाचा कोर्स झाला आहे. त्यामुळे फोटोग्राफी आणि व्हिडिओ यामध्ये त्यांचे विद्यार्थी देखील तरबेज आहेत. आपल्या अंगभूत गुणांमुळे शाळेत रुजू झाल्यानंतर शाळेतील शिक्षिका श्रीम. मनीषा पाडळकर यांच्या मदतीने संघ बांधणी करून कमी कालावधीत शाळेला नावलौकिक प्राप्त करून दिला. श्री.संभाजी खोत यांच्याकडे मुख्याध्यापक पदाची जबाबदारी आली. सरांना आलेल्या अडचणी, त्यावर केलेले उपाय व फलश्रुती खालीलप्रमाणे..

| अ.क्र. | आव्हाने/ अडचणी | केलेले उपाय | फलश्रुती |
|---|---|---|---|
| 1 | पूर्वी कमी कार्यक्षमतेमुळे शाळेची नकारात्मक प्रतिमा निर्माण झालेली होती.शाळेला कुलूप ठोकून दुसऱ्या गावात मुले शिकण्यासाठी पाठवण्या बाबत गावकऱ्यांच्या हालचाली सुरु झाल्या होत्या .शाळा टिकवण्याचे आव्हान होते. | गावकऱ्यांच्या मनात दोघांनी पारदर्शकता, प्रामाणिकपणा व सातत्यपूर्ण कामातून विश्वास संपादन केला. | शिक्षकांच्या कार्यपद्धतीत सकारात्मक बदल झाला व जबाबदारीची जाणीव वाढली.<br>शाळेची नकारात्मक प्रतिमा बदलून सकारात्मक व विश्वासार्ह प्रतिमा निर्माण झाली.<br>गावकऱ्यांचा शाळेवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित झाला.<br>विद्यार्थ्यांना दुसऱ्या गावात पाठवण्याची गरज कमी झाली व शाळेतील प्रवेशसंख्या वाढली.<br>शाळेला कुलूप लावण्याचा धोका टळला व शाळा टिकवण्यात यश मिळाले.<br>पालकांचा शाळेतील सहभाग व सहकार्य वाढले. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता उंचावली व वातावरण प्रेरणादायी झाले.<br>शाळा ही गावासाठी गौरवाची बाब बनली. |
| 2 | गावातील विद्यार्थी शेजारच्या तसेच खाजगी शाळांकडे वळल्याने विद्यार्थी संख्या केवळ ६ राहिले होते , पट टिकवण्याचे आव्हान होते. | गुणवत्तापूर्ण अध्यापन, डिजिटल साधनांचा वापर सुरू केला.मुलांमध्ये आनंददायी शिक्षणाची आवड निर्माण झाली . विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व कौतुकाची पद्धत सुरू केली. | शिक्षकांच्या कार्यपद्धतीत सकारात्मक बदल झाला व जबाबदारीची जाणीव वाढली.<br>शाळेची नकारात्मक प्रतिमा बदलून सकारात्मक व विश्वासार्ह प्रतिमा निर्माण झाली.<br>गावकऱ्यांचा शाळेवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित झाला.<br>विद्यार्थ्यांना दुसऱ्या गावात पाठवण्याची गरज कमी झाली व शाळेतील प्रवेशसंख्या वाढली.<br>शाळेला कुलूप लावण्याचा धोका टळला व शाळा टिकवण्यात यश मिळाले.<br>पालकांचा शाळेतील सहभाग व सहकार्य वाढले.<br>शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता उंचावली व वातावरण प्रेरणादायी झाले.<br>शाळा ही गावासाठी गौरवाची बाब बनली. |
| 3 | शाळेत विजेची सुविधा उपलब्ध नव्हती.यामुळे शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर करताना मर्यादा येत होती .वीज व्यवस्था पूर्ववत करण्याचे आव्हान होते. | ग्रामस्थ व देणगीदारांच्या मदतीने वीज जोडणीसाठी प्रयत्न केले. आवश्यक विद्युत साहित्य व उपकरणे उपलब्ध केली. | शाळेत वीजपुरवठा पूर्ववत सुरू झाला व नियमित उपलब्धता सुनिश्चित झाली.<br>शैक्षणिक तंत्रज्ञानाचा (टीव्ही, प्रोजेक्टर, डिजिटल साधने) प्रभावी वापर सुरू झाला.<br>अध्यापन प्रक्रिया अधिक आकर्षक, आधुनिक व समजण्यास सोपी झाली.<br>विद्यार्थ्यांची अभ्यासातील रुची व सहभाग वाढला.<br>शिक्षकांना नवीन पद्धतीने अध्यापन करण्याची संधी मिळाली.<br>डिजिटल साधनांमुळे विद्यार्थ्यांची समज व गुणवत्ता सुधारली. |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | शाळेचे व्यवस्थापन व माहिती देवाण-घेवाण करण्यात अडचण येत होती .कार्यालयात आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नव्हती.त्यामुळे केंद्र तालुका स्तरावर शाळा ही नेहमीच अप्राप्त यादीत असायची .वरिष्ठ कार्यालयात शाळेची पत पुन्हा प्राप्त करण्याचे आव्हान होते. | शाळेत अनेक आकर्षक उपक्रम, स्पर्धा व नाविन्यपूर्ण शिकवण पद्धती राबवल्या.याचा सकारात्मक परिणाम दिसू लागला . | शाळेतील व्यवस्थापन प्रणाली अधिक सुटसुटीत व कार्यक्षम झाली.<br>आवश्यक कागदपत्रांची योग्य नोंद व उपलब्धता सुनिश्चित झाली.<br>माहिती देवाण-घेवाण प्रक्रिया वेगवान व अचूक झाली.<br>केंद्र व तालुका स्तरावर शाळा अप्राप्त यादीतून वगळली जाऊन नियमित यादीत समाविष्ट झाली.<br>वरिष्ठ कार्यालयात शाळेची पत व विश्वासार्हता पुन्हा प्रस्थापित झाली.<br>प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता व शिस्त निर्माण झाली.<br>शाळेचा एकूण कारभार अधिक प्रभावी व सुस्थितीत आला. |
| 5 | शाळेच्या मैदानावर गवत वाढलेले असल्याने जनावरे चरण्यासाठी सोडली जात होती . खेळ व इतर उपक्रम घेणे कठीण होते.क्रीडांगणाचे योग्य व्यवस्थापन करण्याचे आव्हान होते. | ग्रामस्थ व पालकांच्या सहकार्याने स्वच्छता मोहीम राबवली. मैदान साफ करून खेळासाठी योग्य बनवले नियमित स्वच्छतेची जबाबदारी निश्चित केली. | शाळेचे मैदान स्वच्छ व सुस्थितीत ठेवण्यात यश आले.<br>गवत काढून व व्यवस्थापन केल्यामुळे जनावरांचे येणे कमी झाले.<br>विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित व मोकळे क्रीडांगण उपलब्ध झाले.<br>खेळ व इतर उपक्रम नियमित व प्रभावीपणे घेणे शक्य झाले.<br>विद्यार्थ्यांचा खेळाकडे ओढा व सहभाग वाढला.<br>शारीरिक विकासासोबत शिस्त व संघभावना विकसित झाली.<br>शाळेचे वातावरण अधिक आकर्षक व उत्साही बनले. |
| 6 | शालेय पोषण आहार वितरणामध्ये अनियमितता होती. शालेय पोषण आहाराचा दर्जा निकृष्ट होता .समतोल व पूरक आहार मुलांना मिळवून देण्याचे आव्हान होते. | पोषण आहार वितरणावर नियमित देखरेख ठेवली. नवीन व्यक्ती नेमणुक केली व आहार समिती सक्रिय करून पारदर्शकता वाढवली. | शालेय पोषण आहाराचे नियमित व वेळेवर वितरण सुरू झाले.<br>आहाराचा दर्जा सुधारला व स्वच्छता राखली जाऊ लागली.<br>विद्यार्थ्यांना समतोल व पूरक आहार नियमित मिळू लागला.<br>मुलांच्या आरोग्यात व पोषण स्थितीत सुधारणा झाली.<br>विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली व शाळेत येण्याची आवड निर्माण झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पालकांचा शाळेवरील विश्वास वाढला.<br>पोषण आहार योजनेत पारदर्शकता व शिस्त निर्माण झाली. |
| 7 | विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, गणवेश परिधान व नियमित अभ्यासाबाबत जागरूकतेचा अभाव होता.शाळेतच जो अभ्यास होई त्यावर पुढच्या दिवशी शाळेत आल्यावर दप्तर उघडले जाई. विद्यार्थ्याच्या अभ्यासाचे आव्हान होते. | गुणवत्ता व वेळेचे पालन सुनिश्चित केले वेळेचे पालन, अतिरिक्त वेळ देऊन अध्यापन केले.<br>शाळेचे स्पष्ट नियम तयार करून त्याची अंमलबजावणी केली.<br>सकाळी प्रार्थना, सुविचार, बातम्या यांची सुरुवात केली.<br>नियमित उपस्थिती, स्वच्छता व गणवेशाबाबत मार्गदर्शन केले. | विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व जबाबदारीची जाणीव वाढली.<br>गणवेश नियमितपणे परिधान करण्याची सवय लागली व शाळेतील एकसंधता दिसून आली.<br>विद्यार्थ्यांनी घरीही नियमित अभ्यास करण्यास सुरुवात केली.<br>दैनंदिन अभ्यास, गृहपाठ पूर्ण करण्याची सवय विकसित झाली.<br>विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत व निकालात सुधारणा झाली.<br>शिक्षकांवरील पुनरावृत्तीचा ताण कमी झाला व अध्यापन अधिक परिणामकारक झाले.<br>पालकांचा अभ्यास प्रक्रियेत सहभाग वाढला.<br>एकूणच विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक व अनुशासित शैक्षणिक वातावरण निर्माण झाले. |
| 8 | शाळेत मूलभूत सुविधा अपुऱ्या होत्या.त्यामुळे पालक पाल्यांच्या प्रवेशाला धजावत नव्हते . | पालकांना वैयक्तिक भेटी देऊन शाळेतील बदलांविषयी माहिती दिली.त्याचा परिणाम शाळेचा पट वाढण्यासाठी मदत झाली<br>दोन्ही शिक्षकांनी स्वत:१०,०००/- निधी जमा केला.त्यातून प्रेरित होऊन ग्रामस्थांनी भरघोस आर्थिक मदत केली.सुमारे अडीच ते तीन लाख रुपयांच्या वस्तू व साधने शाळेत उपलब्ध झाली.यामुळे फर्निचर, शैक्षणिक साहित्य यांची व्यवस्था करता आली . डिजिटल शिक्षणासाठी आवश्यक व्यवस्था उभारली. | शाळेत आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे पालकांचा विश्वास वाढला.<br>नवीन विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये लक्षणीय वाढ झाली.<br>शाळेचे वातावरण अधिक सुरक्षित, स्वच्छ व आकर्षक बनले.<br>विद्यार्थ्यांची उपस्थिती व टिकून राहण्याचे प्रमाण (Retention) सुधारले.<br>पालकांचा शाळेशी संपर्क व सहभाग वाढला.<br>शाळेबद्दल समाजामध्ये सकारात्मक प्रतिमा निर्माण झाली.<br>विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेत सुधारणा होऊन एकूण शैक्षणिक गुणवत्ता उंचावली. |
| 9 | सर्व गावकऱ्यांचा शाळेकडे दुर्लक्ष व सहभागाचा अभाव | विविध सण-समारंभात गावाचा सहभाग वाढवला. "गाव शाळेत — शाळा गावात" उपक्रमातून | गावकऱ्यांचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झाला. |

| | | | |
|---|---|---|---|
| | होता.शाळेत फक्त वाद घालण्यासाठीच पालक येत . | लोकसहभाग वाढवला.यातून शालेय सुविधा वाढण्यास मदत झाली. | पालकांचा शाळेच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग वाढला.<br>शाळेत येणाऱ्या पालकांची संख्या वाढली व संवाद अधिक विधायक झाला.<br>वादाचे प्रमाण कमी होऊन सहकार्य व समन्वयाची भावना निर्माण झाली.<br>शाळा व्यवस्थापन समिती (SMC) अधिक प्रभावीपणे कार्य करू लागली.<br>शाळा व समाज यांच्यात विश्वासाचे नाते दृढ झाले.<br>विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांना गावकऱ्यांचे सहकार्य मिळू लागले.<br>एकूणच शाळेच्या विकासासाठी अनुकूल व सकारात्मक वातावरण निर्माण झाले. |
| 10 | श्री .खोत व श्रीम.पाडळकर हे दोघे नवीन शिक्षक एकाच वेळी रुजू झाल्यामुळे ग्रामस्थांच्या मनात पूर्वीच्या शिक्षकांप्रमाणेच शंका व नकारात्मक मत निर्माण झाले होते. | सर्व शैक्षणिक व प्रशासकीय नोंदी नव्याने शाळेचे अभिलेख व्यवस्थित ठेवण्याची पद्धत सुरू केली. माहिती देवाण-घेवाण सुलभ व पारदर्शक केली. नियमित अहवाल व नोंदवही अद्ययावत ठेवल्या. | नवीन शिक्षकांविषयी ग्रामस्थांचा विश्वास हळूहळू वाढला.<br>शिक्षकांनी केलेल्या कार्यामुळे नकारात्मकता कमी होऊन सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला.<br>पालक व शिक्षक यांच्यात सुसंवाद व सहकार्य वाढले.<br>विद्यार्थ्यांच्या प्रगतीमुळे शिक्षकांची कार्यक्षमता ग्रामस्थांना पटली.<br>शाळेच्या उपक्रमांमध्ये ग्रामस्थांचा सहभाग वाढला.<br>शिक्षकांविषयी आदर व विश्वासाचे वातावरण निर्माण झाले.<br>शाळेची एकूण प्रतिमा सुधारून समाजामध्ये सकारात्मक बदल दिसून आला. |
| 11 | पालकांचा शाळेवरील विश्वास पुन्हा निर्माण करणे हे मोठे आव्हान होते. | गावातील शिक्षणप्रेमी पालक व ग्रामस्थांची बैठक आयोजित केली.सुरुवातीला एकही पालक बैठकीसाठी आले नाहीत .शाळा सुटल्यानंतर शिक्षकांनी गृहभेटी देऊन आपल्या पाल्यांसाठी वेळ काढण्याची विनंती केली .हळूहळू | पालकांचा शाळेवरील हरवलेला विश्वास पुन्हा दृढ झाला.<br>पालकांचा शाळेच्या कामकाजात व उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग वाढला.<br>शाळा व पालक यांच्यात नियमित व सकारात्मक संवाद प्रस्थापित झाला. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पालकांचा प्रतिसाद मिळायला सुरुवात झाली .<br>नियमित पालक सभा व ग्रामसभा घेतल्या.शाळेतील प्रगतीची माहिती सार्वजनिकपणे दिली. | विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत व शैक्षणिक प्रगतीत सुधारणा दिसून आली.<br>पालकांनी शाळेबाबत सकारात्मक अभिप्राय देण्यास सुरुवात केली.<br>नवीन प्रवेशांमध्ये वाढ होऊन शाळेची प्रगती गतीमान झाली.<br>एकूणच शाळा—समाज संबंध अधिक मजबूत व विश्वासार्ह झाले. |
| 12 | शाळेची नकारात्मक प्रतिमा समाजात निर्माण झाल्यामुळे ही प्रतिमा बदलण्याचे आव्हान होते. | शाळेतील प्रत्येक सकारात्मक बदलाची माहिती पालकांपर्यंत पोहोचवली.त्यामुळे शाळेबद्दल आदर निर्माण होण्यास मदत झाली .<br>केंद्रस्तरीय परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांची गुणवत्ता दिसू लागली. प्रत्येक पालकाशी वैयक्तिक संवाद साधता आला.विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत नियमित अभिप्राय दिला.<br>विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा घडवून आणली.<br>शैक्षणिक गुणवत्ता वाढवून प्रत्यक्ष परिणाम दाखवले. | शाळेची नकारात्मक प्रतिमा बदलून सकारात्मक व विश्वासार्ह प्रतिमा निर्माण झाली.<br>समाजामध्ये शाळेबद्दल आदर व अभिमानाची भावना वाढली.<br>पालक व ग्रामस्थांचा शाळेवरील विश्वास दृढ झाला.<br>नवीन प्रवेशांमध्ये वाढ होऊन शाळेकडे आकर्षण निर्माण झाले.<br>शाळेच्या उपक्रमांना समाजाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळू लागला.<br>माध्यमे/समाज माध्यमांमध्ये शाळेच्या चांगल्या कामाची दखल घेतली जाऊ लागली.<br>शिक्षक, विद्यार्थी व समाज यांच्यात सुसंवाद व सहकार्याचे वातावरण निर्माण झाले.<br>एकूणच शाळेची गुणवत्ता व प्रगती अधिक ठळकपणे दिसून आली. |
| 13 | पूर्वीच्या अकार्यक्षमतेमुळे शाळेबाबत गावात नकारात्मक वातावरण होते ते पूर्णपणे बदलण्याचे आव्हान होते. | श्री .खोत व श्रीम.पाडळकर यांनी पूर्वीच्या शाळेतील कामाचा आढावा व यशस्वी उपक्रमांची माहिती दिली.याचा सकारात्मक परिणाम होऊ लागला . कामातून स्वतःची ओळख निर्माण केली. | गावातील शाळेबाबतचे नकारात्मक वातावरण पूर्णपणे सकारात्मक झाले.<br>शाळेबद्दलचा अविश्वास दूर होऊन विश्वास व आपुलकी निर्माण झाली.<br>पालक व ग्रामस्थांचा शाळेच्या विकासात सक्रिय सहभाग वाढला.<br>शाळेच्या उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळू लागला.<br>विद्यार्थ्यांची उपस्थिती व नवीन प्रवेशामध्ये वाढ झाली.<br>शिक्षकांच्या कार्यक्षमतेबद्दल समाजात आदर व विश्वास निर्माण झाला. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | शाळा—समाज यांच्यात सुसंवाद व सहकार्याचे मजबूत नाते तयार झाले.<br>एकूणच शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अनुकूल व प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले. |

**यशोगाथा क्रमांक 4**
**विद्या मंदिर हणबरवाडी**
**तालुका करवीर, जिल्हा कोल्हापूर.**
**श्री. भिकाजी डवरी**





ग्रामीण भागातील ही शाळा कोल्हापूर पासून सुमारे 14 किलोमीटर अंतरावर आहे. शिक्षणाची दीर्घ परंपरा असलेली ही शाळा. शाळेत प्रवेश करताना शांत, स्वच्छ व निसर्गरम्य परिसर लक्ष वेधून घेतो. शाळेतील मुख्याध्यापक श्री. भिकाजी शंकर डवरी व शाळेतील शिक्षक वर्ग यांचा समन्वय प्रभावी संघ बांधण्याची साक्ष देतो. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात शाळेतील कामकाज समजून घेण्याची संधी श्री. तुषार पाटील यांच्यामुळे मिळाली. शाळेचे नेतृत्व लोकशाही तंत्राचा पुरेपूर वापर करून करत असल्याचे निदर्शनास आले. शाळेची प्रगती परिवर्तन एका दिवसात घडून येत नाही, त्यासाठी विविध स्तरावर नियोजनबद्ध कामकाज करावे लागते. श्री.डवरी यांच्याकडे मुख्याध्यापक पदाची जबाबदारी आली. सरांना आलेल्या अडचणी, त्यावर केलेले उपाय व फलश्रुती खालीलप्रमाणे..

विविध स्तरावर नियोजनबद्ध कामकाज करावे लागते. श्री.डवरी यांच्याकडे मुख्याध्यापक पदाची जबाबदारी आली. सरांना आलेल्या अडचणी, त्यावर केलेले उपाय व फलश्रुती खालीलप्रमाणे..

| **अ.क्र.** | **आव्हाने/ अडचणी** | **केलेले उपाय** | **फलश्रुती** |
|---|---|---|---|
| 1 | शाळेत शिक्षक संख्या कमी होती. | जोड वर्गाचा मार्ग शोधला.<br>टीम टीचिंग करून समस्या सोडवली. | 1उपलब्ध शिक्षकांचा प्रभावी वापर केल्यामुळे अध्यापन व्यवस्थित सुरू झाले.<br>2.विद्यार्थ्यांचे विषयवार मार्गदर्शन सुधारले व समज वाढली. वर्गातील शिस्त व नियंत्रण अधिक चांगले झाले.<br>3.विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली कारण त्यांना नियमित शिकवणी मिळू लागली.<br>4.शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा होऊन निकालात वाढ झाली.<br>5.पालकांचा शाळेवरील विश्वास पुन्हा निर्माण झाला. शिक्षकांमध्ये कामाचे योग्य वाढ झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | पिण्याच्या पाण्याची उपलब्धता नव्हती. मुलांना व शिक्षकांना शाळेत पाण्याच्या बाटल्या आणाव्या लागत होत्या. | ग्रामपंचायतीने शाळेची गरज ओळखून स्वतंत्र पाईपलाईन दिली. त्यामुळे पाण्याचा प्रश्न निकाली निघाला | 1.शाळेत स्वच्छ व सुरक्षित पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध झाली.<br>2.विद्यार्थ्यांना व शिक्षकांना घरीून पाण्याच्या बाटल्या आणण्याची गरज उरली नाही.<br>3.विद्यार्थ्यांच्या आरोग्यात सुधारणा झाली व पाण्याशी संबंधित आजारांचे प्रमाण कमी झाले.<br>4.विद्यार्थ्यांची उपस्थिती व लक्ष अभ्यासाकडे वाढले.<br>5.शाळेतील स्वच्छता व एकूण वातावरण अधिक चांगले झाले.<br>पालकांचा शाळेवरील विश्वास वाढला.<br>6.शिक्षकांचेही काम अधिक सुलभ झाले. |
| 3 | स्वच्छतागृह वापरात नव्हते, कारण पाण्याची व्यवस्था नव्हती. | ग्रामपंचायतीने स्वतंत्र पाईपलाईन दिल्यामुळे स्वच्छतागृहात पाणीउपलब्ध झाले . | 1.स्वच्छतागृहासाठी पाण्याची नियमित व्यवस्था उपलब्ध झाल्याने स्वच्छतागृह वापरात आले.<br>2.विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या सवयी विकसित झाल्या.<br>3.मुलींची शाळेतील उपस्थिती वाढली व त्यांना अधिक सोयीस्कर वातावरण मिळाले.<br>आरोग्याच्या तक्रारींमध्ये घट झाली.<br>4.शाळेतील स्वच्छता व एकूण वातावरण सुधारले.<br>5.विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा शाळेत राहण्याचा अनुभव अधिक सुखद झाला.<br>6.पालकांचा शाळेवरील विश्वास वाढला. |
| 4 | अपुऱ्या वर्गखोल्या होत्या. त्यामुळे इयत्ता पहिली ते आठवीचे वर्ग पाच खोल्यात भरत होते. | इयत्ता पहिली ते आठवीसाठी फक्त पाच वर्ग खोल्या होत्या .टीमच्या प्रयत्नातून तीन वर्गखोल्या बांधल्या. आमदार फंडातून वर्गाचे सिलिंग,फरशी जिन्याचे टप्पे,दरवाजे ,खिडक्या, स्लाइडिंग, पडदे, इमारत रंगकाम व बोलक्या भिंती इत्यादी कामे झाली आहेत. | 1.वर्गखोल्यांची उपलब्धता वाढल्याने प्रत्येक इयत्तेस स्वतंत्र व योग्य जागा मिळाली.<br>2.अध्यापन अधिक परिणामकारक व नियोजनबद्ध झाले.<br>3.विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रीत राहू लागले व गोंधळ कमी झाला.<br>4.शिक्षकांना अध्यापन करताना सुलभता निर्माण झाली.<br>5.शैक्षणिक गुणवत्ता व निकालात सुधारणा झाली.<br>6.सहशालेय उपक्रम व गटकार्य प्रभावीपणे घेता आले.<br>7.विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली व शाळेतील वातावरण सकारात्मक झाले. |
| 5 | मुख्याध्यापकांना ऑफिससाठी स्वतंत्र खोली नव्हती. | वर्गातच अध्ययन अध्यापन व प्रशासकीय कामकाज चालत होते. अध्यापनात व प्रशासकीय कामकाजात अडचणी येत होत्या. त्यामुळे स्वतंत्र मुख्याध्यापक कक्षाची गरज सातत्याने भासत होती. व्हरांड्यातील मोकळ्या जागेचा उपयोग करून मुख्याध्यापक कक्ष बांधला.यासाठी शासकीय अभियंता श्री. बेरकर यांनी विना मोबदला मुख्याध्यापक कक्ष बांधून दिला. | 1.मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र कार्यालयीन खोली उपलब्ध झाली.<br>2.शाळेचे प्रशासकीय कामकाज अधिक नियोजनबद्ध व सुरळीत झाले.<br>3.पालक व पाहुण्यांशी चर्चा करण्यासाठी योग्य व गोपनीय जागा मिळाली.<br>4.शाळेतील नोंदी, कागदपत्रे व साहित्य व्यवस्थित ठेवता आले.<br>शिक्षक व कर्मचाऱ्यांशी समन्वय अधिक प्रभावी झाला.<br>5.शाळेची एकूण शिस्त व व्यवस्थापन सुधारले.<br>6.शाळेची प्रतिमा अधिक व्यावसायिक व विश्वासार्ह झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | मासिक पाळी व्यवस्थापन करण्यासठी मुलींना चेंजिंग रूमची सोय नव्हती | मासिक पाळी व्यवस्थापनासाठी शाळेत किशोरवयीन मुलींसाठी पिंक रूमची सोय करण्यात आली आहे. सॅनिटरी पॅड साठी प्राथमिक आरोग्य केंद्राची मदत होते. | 1.मुलींसाठी स्वतंत्र व सुरक्षित चेंजिंग रूमची व्यवस्था उपलब्ध झाली.<br>2.मासिक पाळी व्यवस्थापन सुलभ व स्वच्छ पद्धतीने होऊ लागले.<br>3.मुलींच्या उपस्थितीत वाढ झाली व गैरहजेरीचे प्रमाण कमी झाले.<br>4.मुलींमध्ये आत्मविश्वास व सुरक्षिततेची भावना निर्माण झाली.<br>5.आरोग्य व स्वच्छतेबाबत जागरूकता वाढली. शाळेतील वातावरण अधिक 6.संवेदनशील व समावेशक झाले.<br>7.पालकांचा शाळेवरील विश्वास अधिक दृढ झाला. |
| 7 | विद्यार्थ्यांचे अनुपस्थितीचे प्रमाण जास्त होते. | विद्यार्थ्यांचे अनुपस्थितीचे प्रमाण कमी करण्यासाठी शाळेतील विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स किटस उपलब्ध करून दिले आहेत. हा गणवेश मुले बुधवार व शनिवार वापरतात.<br>विद्यार्थ्यांना ओळखपत्र आहेत. ओळखपत्राच्या लेसवर शाळेचे नाव प्रिंट केले आहे. | 1.विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीयरीत्या वाढली. नियमित उपस्थितीमुळे अभ्यासात सातत्य व प्रगती दिसून आली.<br>2.विद्यार्थ्यांचा शाळेबद्दलचा रस व सहभाग वाढला.<br>3.शैक्षणिक गुणवत्ता व निकालात सुधारणा झाली.<br>4.शाळेतील वातावरण अधिक उत्साही व सकारात्मक झाले.<br>5.पालकांचा शाळेवरील विश्वास वाढला.<br>6.शाळा गळती (dropout) कमी झाली. |
| 8 | शाळेला क्रीडांगण नव्हते.त्यामुळे क्रीडा स्पर्धेसाठी सराव करताना अडचण येत असे. | शाळा व समाज यांनी केलेल्या सामूहिक प्रयत्नातून संघ बांधणीचे एक उदाहरण म्हणजे शाळेच्या क्रीडा स्पर्धा घेण्यासाठी शाळेकडे क्रीडांगण उपलब्ध नव्हते. क्रीडांगण नसताना मुलांनी कबड्डी स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला. शिक्षकांनी पालकांचे प्रबोधन केले. शिक्षकांच्या स्वखर्चातून सरपंचाच्या शेतातील माती आणली. ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समितीने ट्रॅक्टर जेसीबीच्या मदतीने एका दिवसात क्रीडांगण तयार केले, याचा सकारात्मक परिणाम असा झाला की, लगतच्यावर्षी कबड्डीत मुलांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यातील संघ भावनेमुळे व सहकार्यामुळे शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक यांनी शाळेतील बदल पालकांच्या ठळकपणे निदर्शनास आणून दिले शाळेत पालकांचे स्वागत केले जाते विविध कार्यक्रमांमध्ये त्यांचा सहभाग घेतला जातो पालक सभा घेतल्या जातात पाद्यपूजनाचा कार्यक्रम देखील घेतला जातो शैक्षणिक | 1.शाळेला क्रीडांगण उपलब्ध झाल्याने नियमित सराव करणे शक्य झाले.<br>2.विद्यार्थ्यांचा क्रीडाप्रती उत्साह व सहभाग वाढला.<br>3.क्रीडा स्पर्धांसाठी तयारी अधिक चांगल्या प्रकारे करता आली.<br>4.विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरुस्ती व आरोग्यात सुधारणा झाली.<br>5.संघभावना, शिस्त व नेतृत्वगुणांचा विकास झाला.<br>6.शाळेने विविध क्रीडा स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी केली.<br>7.शाळेचे नाव व प्रतिष्ठा वाढली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सहलीमध्ये पालकांचा सहभाग घेतला जातो पोलीस देवी पोलीस दादा सारखे उपक्रम राबवून मुलींच्या सुरक्षिततेसाठी खबरदारी घेतली जाते. | |
| 9 | शाळा व्यवस्थापन समिती नावापुरतीच होती. पालकांचा शाळेकडे बघण्याचा दृष्टिकोन नकारात्मक होता. | शाळा, ग्रामपंचायत, शाळा शाळेविषयी विश्वास निर्माण झाल्याने शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत यांच्या मदतीने व जबाबदारीने वनभोजनाचे आयोजन दरवर्षी शाळेत केले जाते. वनभोजनातील मेनूचा खर्च ते स्वतः उचलतात. हे संघभावनेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. | 1.शाळा व्यवस्थापन समिती सक्रिय व कार्यक्षम झाली.<br>2समितीच्या बैठका नियमित होऊ लागल्या व निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता आली.<br>3.पालकांचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झाला.<br>4.पालकांचा शाळेच्या उपक्रमांमध्ये सहभाग वाढला. शाळा व पालक यांच्यातील संवाद अधिक मजबूत झाला.<br>5.शाळेच्या विकासकामांना स्थानिक पातळीवर पाठबळ मिळाले.<br>6.विद्यार्थ्यांच्या प्रगतीत पालकांचे सहकार्य वाढले. शाळेची प्रतिमा समाजात सुधारली. |
| 10 | शाळेला भौतिक सुविधा उपलब्ध नव्हत्या . | व्यवस्थापन समिती व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मदतीने प्रस्ताव सादर करून तालुकास्तरावर शाळेसाठी असलेल्या गरजा अधोरेखित केल्या गेल्या याचा परिणाम असा झाला की, DPDC मधून ५४ लाख रुपये मंजूर करून घेतले आहेत. दोन मजली इमारती मध्ये किचन शेड, स्वतंत्र स्वच्छतागृहे ,डायनिंग, हॅन्डवॉश स्टेशन इत्यादी कामे प्रस्तावित आहेत. या बाबी मुख्याध्यापक, शिक्षक आणि समाज घटकाच्या समन्वयाने जुळून आल्या आहेत. यासाठी शाळेने व गावाने संघभावनेने पाठपुरावा केला हे विशेष.<br>संघभावनेतून शाळेत बरीचशी उठावदार कामे झाली आहेत. साडेसहा लाख रुपयांच्या निधीतून संगणक करून दहा संगणक व आवश्यक फर्निचर केले आहे. | 1.शाळेत आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध झाल्या. अध्यापन-अभ्यास प्रक्रिया अधिक प्रभावी व आकर्षक झाली.<br>2.विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी अनुकूल व सुरक्षित वातावरण मिळाले.<br>3.शाळेतील स्वच्छता, शिस्त व एकूण व्यवस्थापन सुधारले.<br>4.विद्यार्थ्यांचा शाळेकडे ओढा व उपस्थिती वाढली.<br>5.शैक्षणिक गुणवत्ता व निकालात सुधारणा झाली. पालकांचा शाळेवरील विश्वास वाढला.<br>6.शाळेची प्रतिमा समाजात उंचावली. |
| 11 | विद्यार्थ्यांना शिस्त नव्हती स्वावलंबन नव्हते. | मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या संवाद कौशल्याचा परिणाम असा झाला की, गावाशेजारील जैताळ ,कळंबा परिसर व वारकरी संस्थेतील 25 मुले या शाळेत आज शिक्षणाचे धडे घेत आहेत. तर इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील | 1.विद्यार्थ्यांमध्ये शिस्तीची जाणीव व सवयी विकसित झाल्या.<br>2.स्वावलंबनाची भावना वाढली व स्वतःची कामे स्वतः करण्याची तयारी झाली.<br>3.विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास व जबाबदारीची जाणीव वाढली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तब्बल 16 मुले या शाळेत दाखल झाली आहेत. शाळेच्या सर्व घटकांनी ठरवले तर शाळेची पटसंख्या वाढू शकते हेच या उदाहरणातून निदर्शनास येते. | वर्गातील वातावरण अधिक शांत व अभ्यासासाठी अनुकूल झाले.<br>4.विद्यार्थ्यांचा वर्तनात सकारात्मक बदल दिसून आला.<br>5.शिक्षकांना अध्यापन करताना सुलभता निर्माण झाली.<br>6.शाळेची एकूण शिस्त व संस्कारमूल्ये मजबूत झाली. |
| 12 | स्पर्धा परीक्षेत मुलांचा सहभाग नव्हता. | गुणवत्ता वाढीसाठी सर्व शिक्षक जीव ओतून काम करतात. शिक्षक जादा तास घेतात.KTS, मिशन अंकुर , प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती NMMS इत्यादी स्पर्धा परीक्षेत मुले चमकतात.<br>इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्षी वाचन लेखन कार्यशाळेचे आयोजन केले जाते. विद्यार्थी विकास मंडळ (Student Development council) साठी सहा पैकी तीन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. शैक्षणिक वर्ष 2025 मध्ये जिल्हा परेडसाठी शाळेने चित्ररथ बनवला यात श्री. तुषार पाटील यांनी सुरक्षा कवच ही संकल्पना राबवली. यात सीसीटीव्हीच्या माध्यमातून सीईओचे 16 कलमी कार्यक्रम दर्शविले गेले. या चित्ररथाचा जिल्ह्यात प्रथम क्रमांक आला. | 1.विद्यार्थ्यांचा स्पर्धा परीक्षांमध्ये सहभाग लक्षणीयरीत्या वाढला.<br>2.विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती व आत्मविश्वास निर्माण झाला.<br>विविध परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी केली.<br>3.विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेत व विचारशक्तीत वाढ झाली.<br>4.नियमित अभ्यासाची सवय व वेळेचे नियोजन सुधारले.<br>5.शाळेची शैक्षणिक गुणवत्ता व प्रतिष्ठा वाढली.<br>6.पालकांचा विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत उत्साह व सहभाग वाढला. |
| 13 | शाळेत चार महिला व एक पुरुष शिक्षक होते, त्यामुळे प्रशासकीय कामकाज जसे की, बैठकींना जाणे, साहित्य आणणे , गणवेश , पुस्तके इत्यादीचा ताण एकावरच येत होता. | कामाचे योग्य विभाजन केले . | 1.प्रशासकीय कामांचे योग्य वाटप केल्याने एकाच<br>2.व्यक्तीवरील ताण कमी झाला.<br>3.सर्व शिक्षकांचा प्रशासनात सक्रिय सहभाग वाढला.<br>4.बैठका, साहित्य आणणे, गणवेश व पुस्तके यांचे नियोजन अधिक व्यवस्थित झाले.<br>5.शाळेचे कामकाज अधिक सुरळीत व वेळेत पूर्ण होऊ लागले.<br>6.शिक्षकांमध्ये समन्वय व टीमवर्क वाढला.<br>7.अध्यापनासाठी अधिक वेळ उपलब्ध झाला.<br>8.शाळेची एकूण कार्यक्षमता व व्यवस्थापन सुधारले. |
| 14 | सर्वच शालेय उपक्रमावर मर्यादा येत असे. | सर्व प्रशासकीय कामकाज पारदर्शक ठेवले. सर्वांना आर्थिक प्रक्रियेत सहभागी करून घेतले. निर्णय संपूर्ण टीम घेत | 1.सर्व शालेय उपक्रम नियमित व प्रभावीपणे राबवले जाऊ लागले.<br>2.विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग वाढला. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असल्यामुळे व आर्थिक स्वातंत्र्य असल्यामुळे चटकन निर्णयाची अंमलबजावणी होते. शिक्षक आपले उपक्रम आनंदाने राबवतात.<br><br>. डवरी सर स्वखर्चाने दरवर्षी उन्हाळी सुट्टीत श्रमपरिहारासाठी शाळेतील शिक्षकांची सहल आयोजित करतात.<br>संघ बांधणीतून दरवर्षी विद्यार्थ्यांना निगवेकर फार्म हाऊस वर निसर्गाच्या सानिध्यात पर्यावरणाचे धडे दिले जातात. एकही रुपया न घेता मोफत 35 एकरातील फार्म हाऊस मध्ये निसर्ग सौंदर्य व विविध वनस्पतीची माहिती विद्यार्थ्यांना मिळते. ज्ञानरंजनाबरोबरच निसर्गाचा मनमुराद आनंद लुटता येतो. विविध खेळ, गाणी, स्विमिंग,निसर्ग भटकंती यातून मुलांचा विकास केला जातो.<br>रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री लंडन या वैज्ञानिक संस्थेत शाळेतील तेरा विद्यार्थ्यांना निमंत्रित केले गेले. मुलांना युरेका लॅब बघण्याची सुवर्णसंधी देखील मिळाली | 3.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली.<br>4.सांस्कृतिक, क्रीडा व शैक्षणिक उपक्रमांना योग्य संधी मिळाली.<br>5.शाळेतील वातावरण अधिक उत्साही व सजीव झाले.<br>विद्यार्थ्यांमधील कौशल्ये व गुणांना वाव मिळाला.<br>6.शाळेची एकूण गुणवत्ता व प्रतिमा सुधारली. |
| 15 | शाळा सुटल्यानंतर समाज कंटकांचा उपद्रव होत असे . | शाळेत सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत . | 1.शाळा सुटल्यानंतरचा अनुचित उपद्रव पूर्णपणे कमी/नियंत्रित झाला.<br>2.विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेत लक्षणीय वाढ झाली. शाळेच्या परिसरात शिस्त व शांतता निर्माण झाली.<br>3.पालकांचा मुलांच्या सुरक्षेबाबत विश्वास वाढला. स्थानिक समाजाचा शाळेला सकारात्मक पाठिंबा मिळू लागला.<br>4.विद्यार्थ्यांना भीतीमुक्त व सुरक्षित वातावरण मिळाले.<br>शाळेची प्रतिमा समाजात अधिक चांगली झाली. |

**संघ बांधणीतून मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये झालेले बदल...**

1. मुख्याध्यापकांची कार्यक्षमता वाढली.
2. मुख्याध्यापकांचा आत्मविश्वास वाढला.
3. परस्पर सहकार्य वृत्ती जोपासती जाऊ लागली.
4. शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये संबंध प्रस्थापित झाला.
5. शाळेतील उपक्रमांना गती मिळाली.
6. विद्यार्थी विविध उपक्रमात सहभागी होऊ लागले.
7. मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांचे नेतृत्त्व कौशल्य विकसित होऊ लागले.

समता विभाग प्रमुख व संपर्क अधिकारी म्हणून काम करताना  शाळा भेटी देणे, बैठका घेणे, प्रशिक्षणाच्या आयोजन करणे, मुख्याध्यापक शिक्षक विद्यार्थी यांच्याशी संवाद साधणे या गोष्टी करता आल्या. मुख्याध्यापकांच्या कार्यशाळा बैठकांचे आयोजन करता आले .शाळा भेटीत शाळेतील बदल व परिवर्तनाच्या दिशेने मुख्याध्यापकांशी चर्चा व संवाद करता आला. यादरम्यान मुख्याध्यापकांच्या संघ बांधणीत विविध पैलू बाबत मार्गदर्शन करता आले याचे समाधान व आनंद आहे.

**थोडासा विचार, थोडीशी चर्चा करूया !**

1) शाळेत शैक्षणिक गुणवत्ता, भौतिक सुविधांचा अभाव व विद्यार्थ्यांच्या शिक्षणाविषयी अनास्था असलेल्या बहु शिक्षकी शाळेत बदलीने रुजू झाल्यास आपण काय कराल.
2) मुख्याध्यापक शाळेत निर्णय घेताना सर्वांचा सहभाग कसा सुनिश्चित करू शकतात, एका उदाहरणा द्वारे स्पष्ट क्रा.
3) एखाद्या समस्येचे निराकरण करताना संघभावना आणि नेतृत्व एकत्र कार्य करतात किंवा नाही याबाबत आपले मत द्या
4) शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक ,समाज व पर्यवेक्षीय यंत्रणा यांच्याशी समन्वय साधताना मुख्याध्यापक म्हणून कोणते उपाय योजाल.

**संघ बांधणीतून शाळेच्या विकाससंदर्भात असेही करता येईल.....**

1) संघ बांधणीतून शालेय मानवी घटकाशी संबंधित परस्पर विश्वास निर्माण करता येईल.
2) संघ बांधणीत मुख्याध्यापकांना शिक्षक विद्यार्थी समाज यांच्याशी प्रभावी संवाद साधता येईल.
3) सर्व शालेय घटकांमध्ये भूमिकांची व जबाबदाऱ्यांची स्पष्टता सूक्ष्मरित्या करून देता येईल.
4) संघ बांधणीतून अधिक प्रभावी शालेय नेतृत्वास संधी देता येईल.
5) शाळेच्या संघ बांधणीतून कामाबाबत गती व अधिक अचूकता साधता येईल.
6) शाळेच्या विकासासाठी नवकल्पनांना दिशा देता येईल.
7) मुख्याध्यापक शिक्षक विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी यांचे मनोधैर्य उंचावता येईल.
8) एक शिक्षकी शाळेत काम करणाऱ्या शिक्षकाला विविध अंगी भूमिका व जबाबदाऱ्यांची जाणीव करून देता येईल.
9) एक शिक्षकी व द्विशिक्षकी शाळेत काम करणाऱ्या शिक्षकाचे प्रशासन व्यवस्थापन व नियोजन समजून घेता येईल.
10) सर्व शालेय समस्या सोडविण्यासाठी मदत घेता येईल.
11) शालेय वातावरण आनंदी उत्साही व प्रसन्न ठेवता येईल.
12) संघबांधणीतून शालेय विकासासाठी सीएसआर मनुष्यबळ इत्यादी प्राप्त करता येईल.
13) शालेय कृतीवर नियंत्रण साधता येईल.
14) सहकार्य व संघ कार्याची भावना वाढीस लावता येईल.

## संघ बांधणी संदर्भात शासन निर्णय/परिपत्रके :-

संघ बांधणी संदर्भात महाराष्ट्र शासनाने विविध स्तरावर शासन निर्णय व परिपत्रके पारित केले आहेत.

1) दिनांक 17 जून 2010 च्या शासन निर्णयानुसार (आरटीई 2009)अंतर्गत शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना बंधनकारक करण्यात आली आहे. हा शासन निर्णय म्हणजे शाळा स्तरावरील संघ बांधणी चा सर्वात महत्त्वाचा आधार आहे यानुसार मुख्याध्यापक, शिक्षक व पालक यांचे संघ कार्याकडे लक्ष वेधले आहे.
2) सप्टेंबर 2016 च्या परिपत्रकानुसार शाळा व्यवस्थापन समिती सक्षमीकरण व प्रशिक्षण अंतर्गत पालक शिक्षक संवाद वाढवून संघ कार्यक्षम करणे व जबाबदाऱ्यांची जाणीव करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
3) SQAAF (school Quality Assessment frame work) 2025 या परिपत्रकानुसार शाळेच्या गुणवत्तेसाठी टीम तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत मुख्याध्यापक शिक्षक व पालक यांच्या सक्रिय सहभागातून टीमवर्कच्या अनुषंगाने शाळा विकासाकडे लक्ष वेधले आहे.
4) दिनांक 25 सप्टेंबर 2025 च्या शासन निर्णयानुसार शाळा स्तरावरील समित्यांचे एकत्रिकरण करण्यात आले आहे. यानुसार शाळा व्यवस्थापन सुलभ करणे व एकात्मिक टीम तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
5) यासंदर्भात जिल्हास्तरावरून प्राथमिक व माध्यमिक शाळांना वेळोवेळी शिक्षण परिषदा व बैठका यांच्या माध्यमातून सूचना दिल्या आहेत.
6) विविध विषयांच्या अनुषंगाने जिल्हास्तर व तालुका स्तरावर ऑनलाईन व ऑफलाईन बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने संघ बांधणी संदर्भात केलेला विचार :-**

- NEP 2020 मध्ये संघ बांधणी हा शिक्षण व्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला आहे या धोरणात शाळा शिक्षक विद्यार्थी पालक आणि समाज यांना एकत्र आणून सहकार्यात्मक (collaborative) शिक्षण व्यवस्था तयार करण्यावर भर दिला आहे.
- शाळा समूह (school complax) च्या माध्यमातून लहान शाळांना एकत्र आणून शाळा समूह तयार करण्यावर भर देणे यात एकत्रितपणे संसाधनांचा वापर करण्याबाबत विचार करणे शाळेतील शिक्षक साधने व इतर भौतिक सुविधांचेसहकार्य आणि अनुभवांची देवाण-घेवाण संघभावना वाढवणे एकमेकांच्या माध्यमातून शिकण्याची संधी मिळणे.
- शिक्षकांचा व्यावसायिक शिक्षण समुदाय (professional learning community) च्या मदतीने शिक्षकाने एकत्र येऊन चर्चा नियोजन पुनरावलोकन करणे. Team teaching ला प्रोत्साहन देणे. अध्यापन सुधारणा व सहयोगी संस्कृतीची निर्मिती करणे.
- मुख्याध्यापक हा फक्त प्रशासक नसून टीम लीडर असावा.
- शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्यात समन्वय साधणे.
- मुख्याध्यापकांनी प्रेरणा देणे जबाबदाऱ्यांचे वाटप करणे टीमला दिशा देणे.
- शाळा व्यवस्थापन समिती आणि पालक सहभागातून शाळा विकासासाठी समुदायाच्या सहभाग वाढविणे शाळा ही समाजाचा भाग बनवणे सामुदायिक जबाबदारी वाढविणे.
- बहुविषयक दृष्टिकोन (multidisciplinary) यामधून विविध विषय एकत्र शिकविणे शिक्षकांमध्ये विषयानुसार सहयोग निर्मिती करणे संघात काम करण्याची सवय लावणे.
- विद्यार्थ्यांमध्ये संघभावना विकसित करणे गटकार्य प्रकल्पा अभ्यास शिक्षणातून नेतृत्व कौशल्य संवाद कौशल्य वाढविणे.
- समावेशकता आणि संवेदनशीलता मधून सर्वांना समान संधी देणे संघ बांधणी अंतर्गत प्रत्येकाचा सहभाग मिळविणे.
- तंत्रज्ञानाचा वापर करून डिजिटल प्लॅटफॉर्मवर शिक्षक व विद्यार्थ्यांची संवाद साधने ऑनलाईन सहकार्य घेणे.

**NEP 2020 मधील संघ बांधणीचे मुख्य तत्व :-**




**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये (NEP2020) संघ बांधणी संदर्भात निर्देशित केलेल्या शिफारशी :-**

NEP2020 नुसार शाळा ही फक्त अध्यापनाची जागा नसून एक संघटित सहयोगी शिक्षण समुदाय (Learning community) असावी. यात मुख्याध्यापक, शिक्षक ,विद्यार्थी ,पालक आणि समाज हे सर्व मिळून एक मजबूत संघ तयार करतात. संघ बांधणी संदर्भात स्पष्टपणे अनेक शिफारशी दिलेल्या आहेत. याचा मुख्य उद्देश शिक्षण व्यवस्थेत सहकार्य सहभाग आणि सामुदायिक जबाबदारी वाढविणे हा आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये (NEP2020) संघ बांधणी संदर्भात निर्देशित केलेल्या शिफारशी पुढीलप्रमाणे...

1) प्रत्येक शाळा संकुलात सहकार्यात्मक टीम तयार करणे.
2) एकत्रित नियोजन व कार्यवाही करणे.
3) Peer Learning व Team Teaching वाढविणे.
4) शिक्षकांमध्ये सतत शिकण्याची संस्कृती निर्माण करणे.
5) नेतृत्त्व प्रशिक्षण देणे.
6) टीम व्यवस्थापन कौशल्य वाढविणे.
7) निर्णय प्रक्रियेत सर्वांचा सहभाग.
8) SMC ला निर्णय प्रक्रियेत सक्रिय करणे.
9) शाळा विकास आराखडा (school development plan) तयार करताना सर्वांचा सहभाग.
10) शिक्षकांनी एकत्रित नियोजन करणे.
11) प्रकल्पाधारित शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणे.
12) Collaborative learning वर भर.
13) नेतृत्त्व व संवाद कौशल्य विकसित करणे.

**संघ बांधणीतून शाळेचा विकास व शालेय नेतृत्त्वाची भूमिका या मोड्युलची शालेय नेतृत्त्वाच्या दृष्टिकोनातून भूमिका:-**

NEP 2020 मध्ये संघ बांधणी हा शिक्षण व्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला आहे. शालेय नेतृत्त्व करत असताना मुख्याध्यापकांना सर्व शालेय घटकांना सहभागी करून घ्यावे लागते गुणवत्ता विकास साधताना जबाबदारीचे वाटप करावे लागते सर्व घटकांना बरोबर घेऊन उपक्रमांचे एकत्रितपणे कार्यवाही करावी लागते. सहकार्यात्मक टीम तयार करून शालेय नेतृत्त्व करावे लागते यासाठी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये सकारात्मक दृष्टिकोन विकसित करण्यात आला. या सर्व अभ्यासातूनच module ची निर्मिती झाली. याचा फायदा नक्कीच नेतृत्त्व विकासाच्या वाटचालीस होईल.

1.शाळेचे स्पष्ट ध्येय व उद्दिष्ट तयार होईल. 2. कामाचे योग्य वाटप होईल. 3. परस्पर विश्वास व आदर निर्माण होईल. 4.सतत शिकण्याची वृत्ती वाढेल. 5. सकारात्मक कार्य संस्कृती निर्माण होईल. 6.समस्या निवारण कौशल्य अवगत होईल.7. नेतृत्त्व गुणांची जोपासना होईल. 8. एकत्रित उपक्रम व कार्यक्रम घेता येतील.9. भावनिक सुरक्षितता निर्माण होईल. 10. शिस्तबद्ध व मैत्रीपूर्ण वातावरण तयार होईल .11.टास्क पूर्तता होईल. 12. सहयोगी चर्चा घडून येईल. विद्यार्थ्यांच्या विविध क्षमतांचा विकास होईल . 13. पालकांचा सहभाग घेता येईल. 14.आरोग्य व सुरक्षा व्यवस्थापन करता येईल. 15. वेळेचे व्यवस्थापन करता येईल. 16. तंत्रज्ञानाचा योग्य वापर करता येईल. 17.शालेय पर्यावरण जागरूकता करता येईल. 18. विद्यार्थ्यांच्या मतांची कदर करता येईल. 19.प्रभावी स्टाफ मीटिंग येतील. व्यावसायिक संवाद साधायला मदत होईल.

**समारोप :-**

शिक्षण क्षेत्रात काम करताना अनेक विपरीत व प्रतिकूल परिस्थितीतून नेतृत्त्वाला मार्ग काढावा लागतो. विद्यार्थ्यांना शाळेत आणणे शिकविणे आणि टिकविणे त्याचबरोबर NEP2020 मध्ये नमूद केलेल्या अपेक्षापूर्ती नुसार गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे सामर्थ्य सक्षम नेतृत्त्वाकडे असते. शाळेचा नेता म्हणून काम करत असताना शालेय नेतृत्त्व विकसित होत असते. यात नियोजन, व्यवस्थापन व प्रशासन तसेच स्वयं विकास ,अन्य शालेय घटकांचा विकास ,भागीदारी व संघ बांधणी यातील भूमिका व जबाबदारी यांचा समावेश होतो. नेता हा संघ बांधणीतून अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी परिणामकारक होण्यासाठी तसेच प्रत्येक विद्यार्थ्याचे अपेक्षित संपादन गाठण्यासाठी सहकाऱ्यांना देखील प्रेरित करतो. आपल्या कार्यक्षेत्रात स्वतःच्या उदाहरणातून शालेय नेतृत्त्वाचा आदर्श निर्माण करतो. कोल्हापूर जिल्ह्यातील शिराळा, करवीर व शाहूवाडी या ग्रामीण भागातील शाळेत मनुष्यबळ असताना काम करणारे श्री. खवाटे व श्री. डवरी व मनुष्यबळ नसताना काम करणारे श्री. संदीप पाटील व श्री. संभाजी खोत यांच्यासारखे अनेक मुख्याध्यापक व शिक्षक कोल्हापूर जिल्ह्यात कार्यरत आहेत. या सर्वांच्या अभ्यासातून शालेय नेतृत्त्व संघ बांधणीतून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी यशस्वी कार्य करत राहो हीच मनस्वी सदिच्छा !

**संदर्भ साहित्य :-**

1. शासन निर्णय दिनांक 17 जून 2010 (आरटीई 2009 )
2. शाळा व्यवस्थापन समिती सक्षमीकरण शासन निर्णय दिनांक सप्टेंबर 2016
3. परिपत्रक SQAAF (school Quality Assessment frame work) 2025
4. 4.शासन निर्णय दिनांक सप्टेंबर 2025 शाळा स्तरावरील समित्यांचे एकत्रिकरण

5. जानेवारी 2018 शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम पूरक वाचन साहित्य, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे.
6. डिसेंबर 2019 निष्ठा मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे.
7. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 सारांश
8. निपा व मिपा स्तरावरील मॉड्यूल्स

**युट्युब लिंक :-**

- **शिरटी हायस्कूल शिरटी,तालुका शिरोळ, जिल्हा कोल्हापूर.**

https://www.instagram.com/reel/DWOwR8fk3Jl/?igsh=ZDZuNzFqNTIwZm9v
https://www.instagram.com/reel/DWOr2Xwk7MC/?igsh=MXVwemp6aHVrd3dmNQ==
https://www.instagram.com/reel/DWOriQMk_7x/?igsh=MWZ0dTlxM25vYmVndw==
https://www.instagram.com/reel/DWOq9Amk5H4/?igsh=MTVhMzUydWU1djhhZA==
https://www.instagram.com/reel/DTReVvbE48z/?igsh=MWliaXQ0MWw3Mnk2eg==
https://youtu.be/grxOrs8YeKk?si=G1O4gcq2EqX5Hl8f
https://youtu.be/3tUWUlOc__E?si=lRiA-z3Z9S4-tI1Y

- **विद्या मंदिर चाळणवाडी, तालुका शाहुवाडी, जिल्हा कोल्हापूर.**

https://www.instagram.com/reel/DSb-d-aDCGE/?igsh=MTYwZjI3YzVnNXp5dA==
https://www.instagram.com/reel/DQTbsRtCAA8/?igsh=MTN0dTgydjdueWRhNQ==
https://drive.google.com/file/d/1gWbPo-Ctj0cW6mmjOB2mvuYtxi7gyQ8L/view?usp=drivesdk
https://youtu.be/neYREqFm-ik?si=enj1Y1ELUmx_FWH-
https://www.instagram.com/reel/DTpO-TgiIll/?igsh=eXBzZHZ0czF2Y2o4
https://www.facebook.com/share/v/1EGTJj47iP/
https://drive.google.com/file/d/1ad3Q4-DmcCkLIU7i97KGU5udWZZ4XUR3/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/1krzygCZ2mFQzZW83JCWbgmYz-w7L5DIz/view?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/1_7Ya6a-9A5e78MwYLk8JRiYHfpi6QmPt/view?usp=drivesdk

- **विद्यामंदिर ठमकेवाडी तालुका शाहुवाडी, जिल्हा कोल्हापूर.**

https://youtu.be/L1oCg8CQMaA?si=aIeMrc2kSm6-rKbO

https://youtu.be/-qLo50OmWXU?si=Bty-CwG7i8DdJRY7
**पूर्वीची शाळा आणि बदल झालेली शाळा**
https://youtu.be/HFeUfOnS7ZA?si=jEIo2pzFSPeOGR_2
**पर्यावरण पूरक उपक्रम**
https://youtu.be/NJemTVFpXPY?si=Lic4zfS60uHJ145x
**आषाढी वारी उपक्रम**
https://youtu.be/jGf1uQutmUY?si=MNROeLSyDxBji9Be
**शाळा व्यवस्थापन समिती बैठक**
https://youtu.be/aqq9eu_l5wM?si=PIZiZdJZnOkyKj_s
**विविध उपक्रम**
https://youtu.be/GnCF5TiHujM?si=Z8FYsYi8Y0-hJsbC
https://youtu.be/GnCF5TiHujM?si=nh0J84mueh2jn7Fa

- **विद्या मंदिर हणबरवाडी, तालुका करवीर, जिल्हा कोल्हापूर.**

https://youtube.com/shorts/q_lyhS_I_pY?si=E4ZrZn5k_LAVN8E7
https://youtube.com/shorts/I2KDcXoU0Yw?si=kb6zkXsBJxF7JSVL

https://youtube.com/shorts/q26dLp0gbqI?si=kk6-7ViaYstIUJhn
https://www.facebook.com/share/r/1S8Jbxt8R4/
https://youtube.com/shorts/hSqgbLcM6Ao?si=ItkxWqCW6Nq6-VJZ
https://www.facebook.com/share/r/1S8Jbxt8R4/
https://youtube.com/shorts/hSqgbLcM6Ao?si=ItkxWqCW6Nq6-VJZ
https://www.youtube.com/live/X-JXtxHZADo?si=qW1VfYUK1JtBy1KT
https://youtube.com/shorts/B6V5WVzoLjs?si=P6Q9TRCfm8R5H06S
https://youtube.com/shorts/tRTCCJ5WcXA?si=652djFlSjccX2R4F


**मोड्यूल विकसक**
**डॉ. अंजली सतीश रसाळ**
**वरिष्ठ अधिव्याख्याता**
**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,सांगली.**

**समन्वयन**
**डॉ. ज्योती कुलकर्णी**
**प्रशासकीय अधिकारी**
**महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा)**
**छत्रपती संभाजीनगर**

**मार्गदर्शन**
**श्री.प्रकाश मुकुंद**
**संचालक**
**महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा)**
**छत्रपती संभाजीनगर**